रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक २९८
www.ramprahar.com
शुक्रवार, १६ मे २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

सुरक्षित प्रवासासाठी एसटीच्या स्मार्ट बस येणार/२
रोह्यात शासन आपल्या दारी उपक्रमाला प्रतिसाद/५
वाढता उष्मा, चाऱ्याअभावी गुरांचे आरोग्य धोक्यात/७

## भारताकडून तुर्कीश कंपनीचा सिक्युरिटी क्लियरन्स रद्द



**नवी दिल्ली** : पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानला पाठिंबा देणाऱ्या तुर्कीला भारताने दणका दिला. भारताने देशातील प्रमुख विमानतळांवर ग्राउंड हँडलिंग सेवा देणारी तुर्की कंपनी सेलेबीची सुरक्षा मंजुरी तत्काळ रद्द केली. राष्ट्रीय सुरक्षेच्या कारणास्तव हा निर्णय घेण्यात आल्याचे ब्युरो ऑफ एव्हिएशन सिक्युरिटीकडून स्पष्ट करण्यात आले. भारत आणि पाकिस्तानमधील अलिकडच्या लष्करी संघर्षादरम्यान तुर्कीने उघडपणे पाकिस्तानला पाठिंबा दिला. यामुळे भारत आणि तुर्कीमधील संबंधांमध्ये पुन्हा एकदा कटुता निर्माण झाली. तुर्कीला धडा शिकवण्यासाठी भारतीय व्यापाऱ्यांनी तुर्कीच्या वस्तूंवर बहिष्कार टाकला. याचबरोबर या दोन्ही देशात जाणाऱ्या ६० टक्के भारतीय पर्यटकांनी आपले बुकिंग रद्द केली. त्यानंतर बीसीएएसने तुर्कीला आणखी एक धक्का देत सेलेबी कंपनीची सुरक्षा मंजुरी तत्काळ रद्द केली आहे.

# शक्य तिथे महायुती करू, अपवादात्मक ठिकाणी वेगळे लढू आणि पुन्हा एकत्र येऊ!

### महापालिका निवडणुकांबाबत मुख्यमंत्री फडणवीसांची माहिती



**पुणे : प्रतिनिधी**

आम्हाला आगामी महापालिकांच्या निवडणुका महायुती म्हणूनच लढायच्या आहेत, मात्र ही निवडणूक कार्यकर्त्यांची आहे. ज्या ठिकाणी तुल्यबळ परिस्थिती आहे, त्या ठिकाणी मित्रपक्षाला जास्त जागा सोडता येणार नाहीत. त्यामुळे शक्य तिथे महायुती करून अपवादात्मक ठिकाणी आम्ही वेगवेगळे लढू आणि निवडणुकीनंतर पुन्हा एकत्रित येऊ, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

राज्यातील महापालिका आयुक्त आणि नगर परिषदांचे मुख्याधिकारी यांच्या यशदा येथे आयोजित केलेल्या दोन दिवसीय कार्यशाळेस मुख्यमंत्री फडणवीस यांनी गुरुवारी (दि. १५) भेट दिली. त्यापूर्वी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका १२० दिवसांत घेण्याचे आदेश न्यायालयाने दिल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, न्यायालयाच्या आदेशानुसार निवडणूक घेण्यात मला अडचण वाटत नाही. निवडणुक आयोगाने तयारी सुरू केली आहे. आम्ही वेळेत निवडणुका घेण्याचा प्रयत्न करू. ज्या भागात पाऊस जास्त असेल त्या भागातील निवडणुका थोड्या पुढे ढकलण्याची विनंती आम्ही निवडणूक आयोगाला करू, पण वेळेत निवडणुका पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न राहील.

महापालिकांच्या निवडणुका स्वबळावर लढणार की महायुतीच्या माध्यमातून या प्रश्नावर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आम्हाला महापालिकांच्या निवडणुका महायुती म्हणूनच लढायच्या आहेत. आम्ही तिन्ही पक्ष एकच आहोत, मात्र ही निवडणूक कार्यकर्त्यांची आहे. कार्यकर्ते पाच पाच, सात सात वर्ष काम करतात. त्यांना निवडणूक लढवावी, असे वाटणे सहाजिकच आहे. ज्या ठिकाणी तुल्यबळ परिस्थिती आहे, त्या ठिकाणी मित्र पक्षाला जास्त जागा सोडता येणार नाहीत. त्यामुळे शक्य तिथे महायुती करून अपवादात्मक ठिकाणी आम्ही वेगवेगळे लढू आणि निवडणुकीनंतर पुन्हा एकत्रित येऊ, असे मुख्यमंत्री म्हणाले. अपवादात्मक ठिकाणी जेथे स्वतंत्र निवडणूक लढू, तेथे एकमेकांवर टीका न करता सकारात्मक प्रचार करू तसेच जास्तीत जास्त ठिकाणी महायुती करण्याचा आमचा प्रयत्न असेल, असेही त्यांनी नमूद केले.

### नेशन फर्स्ट ही आमची भूमिका!

पाकिस्तानची साथ दिली म्हणून तुर्कस्तानविरोधात देशभरात बायकॉट तुर्की हा ट्रेंड चालवला जात आहे. या संदर्भात पुण्यातील एका व्यापाऱ्याला पाकिस्तानकडून धमकीदेखील देण्यात आली आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारण्यात आले. त्या वेळी ते म्हणाले, ज्यांनी बायकॉट केले आहे त्यांचे मी अभिनंदन करतो. नेशन फर्स्ट ही आमची भूमिका असली पाहिजे. जो देश मानवतेच्या विरोधात आहे त्या देशाला जर कोणी सपोर्ट करीत असेल, तर त्यालादेखील जागा दाखवणे गरजेचे आहे. ज्या व्यापाऱ्यांनी नेशन फर्स्ट ही भूमिका स्वीकारली त्यांचे मी अभिनंदन करतो. आम्ही व्यापाऱ्यांच्या मागे उभे आहोत, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# पनवेल तालुक्यातील पाणीपुरवठा सुरळीत करा; अन्यथा आंदोलन!

### आमदार प्रशांत ठाकूर यांचा अधिकाऱ्यांना इशारा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्याच्या ग्रामीण भागातील पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी (दि. १५) पनवेल पंचायत समितीमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांसोबत तातडीची बैठक आयोजित केली होती. या बैठकीत आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले तसेच कार्यवाही न झाल्यास मोठे आंदोलन उभारण्याचा इशारा अधिकाऱ्यांना दिला.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत त्यांनी एमजेपी, एमआयडीसी आणि पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांची पाणीप्रश्नी कानउघाडणी केली. ग्रामीण भागातील जनतेला पुरेसे पाणी मिळत नसेल, तर या संदर्भात मोठे आंदोलन उभे केले जाईल, अशा शब्दांत त्यांनी अधिकाऱ्यांना सुनावले तसेच या गंभीर परिस्थितीची दखल घेत लवकरच ग्रामविकासमंत्र्यांकडे याबाबत बैठकीचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगत अधिकाऱ्यांनी लक्ष घालून पाठपुरावा करण्याची सूचना केली.

या बैठकीला भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांच्यासह पंचायत समिती, एमजेपी आणि एमआयडीसीचे अधिकारी तसेच ग्रामपंचायतींचे सरपंच उपस्थित होते.

# ताडगाव जादुटोणाप्रकरणी मांत्रिकही गजाआड



**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुलीने प्रियकराचा नाद सोडावा म्हणून दाम्पत्याने जादुटोणाच्या आहारी जात तावीज बांधलेल्या विटा ताडगाव येथील सार्वजनिक विहिरीत टाकल्याची घटना घडली होती. या प्रकरणी रेवदंडा पोलिसांनी या दाम्पत्यानंतर आता मांत्रिकालाही गजाआड केले आहे.

या प्रकरणातील अखलास खान (वय ४७) आणि त्यांची पत्नी सेमा खान (वय ४७, रा. नेरूळ, नवी मुंबई) यांना पोलिसांनी यापूर्वीच अटक केली होती. अधिक तपास करून मौलवी खलिय या मांत्रिकाला कल्याणच्या गोविंदनगरमधून अटक करण्यात आली आहे.

आपल्या मुलीने प्रियकराचा नाद सोडावा म्हणून खान दाम्पत्याने मांत्रिक खलियच्या सांगण्यावरून तावीज बांधून घेतलेल्या पाच विटा साळाव ब्रिज ते ताडवाडीदरम्यान रस्त्यालगत असलेल्या गावच्या सार्वजनिक विहिरीत टाकल्या होत्या. ही बाब एका ग्रामस्थाच्या निदर्शनास आल्यानंतर विहिरीत विष टाकल्याची शंका निर्माण झाली तसेच पाकिस्तानविरोधातील युद्धजन्य परिस्थितीत वातावरण बिघडले होते.

सार्वजनिक विहिरीचे पाणी दुषित करून जनतेच्या मनात दहशत व घबराट निर्माण होईल असे अघोरी कृत्य केले म्हणून याबाबत ग्रामस्थांमार्फत रेवदंडा पोलिसांत तक्रार देण्यात आली होती. त्यानुसार गुन्हा दाखल होऊन तपासाअंती आधी दाम्पत्य व त्यानंतर मांत्रिकाला बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.



पनवेल : शेकापमधून नुकतेच भाजपमध्ये प्रवेश केलेले कोन ग्रामपंचायतीचे सरपंच जितेश शिसवे, सदस्य साहिल म्हात्रे, अक्षय घरत आदींनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. या वेळी भाजप नेते दीपक म्हात्रे, संतोष गाताडे, माजी उपसरपंच लक्ष्मण म्हात्रे, सामाजिक कार्यकर्त्या मानसी म्हात्रे, विजय म्हात्रे, भाजप तालुका उपाध्यक्ष संदीप पाटील, मयूर म्हात्रे, राहुल घरत, नितीन म्हात्रे, हरेश शिसवे, जयेश गाताडे हेही उपस्थित होते.

# काश्मिरमध्ये आणखी तीन दहशतवाद्यांचा खात्मा

**श्रीनगर : वृत्तसंस्था**

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय सैन्य दहशतवाद्यांविरोधात पूर्ण क्षमतेने कारवाई करीत आहे. शोपियाननंतर गुरुवारी (दि. २२) पुलवामातील त्राल येथे झालेल्या चकमकीत सुरक्षा दलांनी तीन दहशतवाद्यांना ठार केले.

याबाबत माहिती देताना एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, दक्षिण काश्मीरमधील त्राल भागात दहशतवाद्यांच्या उपस्थितीची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी परिसराला वेढा घातला आणि शोधमोहीम सुरू केली. या दरम्यान दहशतवाद्यांनी सुरक्षा दलांवर गोळीबार केला. त्यानंतर चकमक सुरू झाली. प्रत्युत्तरादाखल केलेल्या कारवाईत तीन दहशतवादी मारले गेले. हे दहशतवादी जैश-ए-मोहम्मद संघटनेचे असून अहमद बट्ट, आमिर नजीर वानी आणि आसिफ अहमद शेख अशी त्यांची नावे आहेत.

### वसई विरार मनपाच्या नगररचना उपसंचालकाकडे सापडली कोट्यवधींची माया

**नालासोपारा** : वसई विरार महापालिका क्षेत्रातील बेकायदेशीर जमीन विकास आणि मनी लॉण्डरिंग प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) कारवाई केली आहे. ईडीने मुंबई व हैदराबादमधील १३ ठिकाणी छापे टाकून ३२ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीची बेहिशेबी मालमत्ता जप्त केली.

ईडीने वसई विरार मनपाचे नगररचना उपसंचालक वाय.एस. रेड्डी यांच्या मुंबई व हैदराबाद येथील निवासस्थानांवर धाडी टाकल्या. या वेळी ८.६ कोटी रुपये इतकी रोख रक्कम, तर २३.२५ कोटींचे दागिने आणि सोने जप्त करण्यात आले.

# अवकाळी पावसाने सुधागडला झोडपले

### पाली-खोपोली मार्गावर झाडे कोसळून वाहतुकीचा खोळंबा

**पाली : प्रतिनिधी**

सध्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस रायगड जिल्ह्याच्या विविध भागात धुमाकूळ घालतोय. या पावसाने पाली, परळी, पेडली, महागाव, नांदगावसह सुधागड तालुक्याला झोडपून काढले. वारा पावसात पाली-खोपोली राज्य मार्गावर परळीसह अन्य काही ठिकाणी झाडे, फांद्या तुटून पडल्या. त्यामुळे वाहतुकीवर परिणाम झाला.



गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात अवकाळी पाऊस हजेरी लावत आहे. असाच मंगळवारी व बुधवारी सुधागड तालुक्यात अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस पडला. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले, तर वृक्ष, फांद्या उन्मळून वाहतुकीलाही फटका बसला. पडलेली झाडे जेसीबीच्या मदतीने बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली.



# सुरक्षित प्रवासासाठी एसटीच्या स्मार्ट बस येणार



**मुंबई, : प्रतिनिधी**

भविष्यात एसटीच्या प्रवाशांना सुरक्षित प्रवासाबरोबरच वक्तशीर बस सेवा देण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज असलेली एसटीच्या 'स्मार्ट बसेस' घेण्यात येणार आहेत. अशी माहिती परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

नव्या तीन हजार बसेस खरेदीच्या अनुषंगाने बोलावलेल्या बस बांधणी कंपन्यांच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला एस. टी. महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर व संबंधित खाते प्रमुखांसह बस बांधणी कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मंत्री सरनाईक म्हणाले की, नवीन लालपरी सह येणाऱ्या सर्व बसेस मध्ये ए.आय. तंत्रज्ञानावर आधारित कॅमेरे, जीपीएस तंत्रज्ञान, एलईडी टीव्ही, वाय-फाय, चालक ब्रेथ नालाइज यंत्रणा, याबरोबरच चोरी-प्रतिबंध तंत्रज्ञान वर आधारित बस लॉक सिस्टम असे आधुनिक तंत्रज्ञान एकात्मिक पद्धतीने लावण्यात येणार असून या बसेस प्रवाशांसाठी अधिक सुरक्षित आणि आरामदायी असतील.

स्वारगेट बसस्थानकावरील घटनेच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांच्या सुरक्षेला यापुढे अत्यंत महत्त्व दिले जाणार असून, प्रवासात बसेसमध्ये प्रवाशांसोबत कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असून, चालकाच्या गाडी चालवण्याच्या पद्धतीवर देखील या कॅमेराचा 'तिसरा डोळा' लक्ष ठेवून असणार आहे. तसेच बसस्थानक व परिसरामध्ये पार्किंगमध्ये उभ्या बसेस देखील पूर्णतः बंद राहतील अशी यंत्रणा बसमध्ये बसविण्यात येणार आहे, अशी माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली.

नवीन बसेसमध्ये लावण्यात येणाऱ्या एलईडी टीव्हीच्या माध्यमातून जाहिराती बरोबर विविध महत्त्वाच्या घडामोडी तसेच सन्माननीय पंतप्रधान, मुख्यमंत्री यांचे संदेश तातडीने प्रवाशांपर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रवासात देखील प्रवासी जगभरातील घडामोडी बाबत अपडेट राहतील. तसेच बसच्या बाहेरील बाजूस देखील जाहिरात प्रसिद्धीकरिता एलईडी पॅनल लावण्यात येणार आहेत. यातून महामंडळाचा जाहिरात महसूल वाढण्यास मदत होणार आहे.

सध्या तापमान वाढीमुळे एसटी बसेसला आग लागण्याच्या घटना घडत आहेत. या आगीला प्रतिबंध करण्यासाठी फोम बेस आग प्रतिबंधक यंत्रणा लावण्यात येणार असून बसमध्ये ज्या ठिकाणी आग प्रज्वलित होईल, त्याचा शोध घेऊन त्या ठिकाणी संबंधित फोम वापरून आग तात्काळ विजवण्याची व्यवस्था या यंत्रणेत करण्यात आली आहे.

या आधुनिक तंत्रज्ञानामुळे प्रवाशांचा सुरक्षिततेबरोबरच बसच्या अपघातांची संख्या कमी करणे, तसेच बस फेऱ्यांचा वक्तशीर पणा वाढवणे यासाठी देखील मदत होणार आहे. त्यामुळे भविष्यात खऱ्या अर्थाने एसटीस्मार्ट होईल, असा विश्वास सरनाईक यांनी व्यक्त केला.

# कर्जतमध्ये प्राणीगणनेत बिबट्याचे दर्शन, तर एका ठिकाणी आढळले ठसे





**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत आणि खालापूर तालुक्यातील काही भाग आदी १३ ठिकाणी चांदण्या रात्री प्राणी गणना करण्यात आली. यावर्षीच्या प्राणी गणनेत आनंदाची बाब वन विभाग यांच्यासाठी ठरली आहे. तब्बल दोन ठिकाणी बिबट्याचे अस्तित्व दिसून आले असून मांडवणे रेंज मधील हुमगावचे जंगलात पाणवठ्यावर आलेला बिबट्याचे दर्शन झाले. दरम्यान,गेली काही दिवस सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे तालुक्यात बहुसंख्य ठिकाणी जंगलात पाण्याचे साठे निर्माण झाले आहेत. त्यामुळे प्राणी जंगलातून पाणवठ्यावर पाण्यासाठी बाहेर आले नसल्याची शक्यता आहे.

कर्जत तालुक्यात प्राणी गणनेसाठी कर्जत वन विभागाच्या तिन्ही विभागाचे माध्यमातून नियोजन करण्यात आले होते. कर्जत पूर्व विभागामध्ये पाच तर कर्जत पश्चिम विभागात चार आणि माथेरान नेरळ विभागात चार ठिकाणी प्राणी गणना करण्यासाठी जंगलातील पाणवठ्याच्या ठिकाणी मचाण बनविण्यात आले होते. सायंकाळ पासून दुसऱ्या दिवशी दुपार पर्यंत ही प्राणी गणना करण्याचे नियोजन केले होते. माथेरान नेरळ वन विभागात वन क्षेत्रपाल उमेश जंगम यांच्या नेतृत्वाखाली वन पाल एस एस म्हात्रे आणि राजवर्धन आढे यांनी प्रत्येकी दोन ठिकाणी प्राण्याच्या येण्याकडे लक्ष ठेवले होते. माथेरान जंगलातील शार्लोट लेक आणि सिम्पसन टँक या ठिकाणी प्राणी गणना करण्यासाठी वन कर्मचारी तैनात होते.तर नेरळ भागातील जुम्मापट्टी येथे राठी भागात तर लव्हालवाडी येथे वन क्षेत्र प्लूटो ५० मधील पाणथळ या ठिकाणी रात्रभर कर्मचारी थांबून होते. त्यात माथेरान मध्ये भेकर, रान डुक्कर आदी प्राणी पाणी पिण्यासाठी आल्याची माहिती वन क्षेत्रपाल जंगम यांनी दिली.

कर्जत पश्चिम मधील पाच ठिकाणी पाणी पिण्यासाठी प्राणी आले,त्यात मोर, उद मांजर, भेकर, रान डुक्कर, मुंगूस, घुबड, सांबार असे प्राणी आणि पक्षी आल्याची नोंद झाली आहे.कर्जत पश्चिम मधील भागात बोरगाव, सुगवे, चौक, वरोसे, कर्जत अशा ठिकाणी प्राणी गणना साठी मचाण उभारल्या होत्या. वनक्षेत्रपाल समीर खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल वैजनाथ फड - बोरगाव, उदय मोरे - सुगवे,विठोबा सरगर-चौक,विक्रम बदडे -वावरले आणि देवराव आदीवाड- कर्जत या ठिकाणी प्राणी गणना करण्यासाठी आपल्या हद्दीतील वन मजूर आणि वन रक्षक यांच्यासह हजर होते आणि त्यांच्या टीम मध्ये एक महिला वन कर्मचारी देखील होत्या.

खरालाचे पाणी येथे दिसला बिबटा ...

कर्जत पूर्व भागातील चार ठिकाणी प्राणी गणना करण्यात आली. त्यात मांडवणे वन क्षेत्रातील हुमगाव येथील खराळाचे पाणी या ठिकाणी जंगल भागात असलेल्या पाणवठ्यावर रात्री बिबट्या पाणी पिण्यासाठी आल्याची नोंद तेथील वन कर्मचारी वनपाल विष्णू थोरात,तसेच वन कर्मचारी शंकर पवार,श्रीरंग काकडे आणि वन मजूर खरात यांच्या नजरेस पडला. अशी माहिती वन अधिकारी प्रदीप चव्हाण यांनी दिली. तसेच सोलनपाडा पाझर तलाव परिसरात प्राणी गणना कर्मचाऱ्यांना बिबट्याच्या वास्तव्याचे ठसे आढळून आल्याची नोंद करण्यात आली. त्या ठिकाणी वन पाल के. डी. लांगी यांचे पथक तर अन्य प्राणी गणना क्षेत्र हे खांडपे येथील पाझर तलाव येथे वन पाल दत्तात्रय केवारी आणि ढाक येथे दुर्गम भागात हिम्मत पाटील यांचे पथक रात्रभर तैनात होते.

# अमृत २.०मधील मलउदंचन केंद्र कामांना गती देण्याचे निर्देश



**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या वतीने सुरू असलेल्या सुविधा कामांची प्रत्यक्ष पाहणी करून महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने या कामांना गती दिली जात आहे. या अनुषंगाने आयुक्तांनी वाशी व कोपरखैरणे विभागात अमृत २.० अंतर्गत सुरू असलेल्या मलउदंचन केंद्रे तसेच कोपरखैरणे सेक्टर १९ येथील धारण तलावाच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करीत मौलिक सूचना केल्या. याप्रसंगी त्यांच्या समवेत शहर अभियंता शिरीष आरदवाड, अति.शहर अभियंता अरविंद शिंदे आणि संबंधित अधिकारी व अभियंते उपस्थित होते.

कामांची पाहणी करताना आयुक्तांनी वाशी सेक्टर ३, सेक्टर १२ व सेक्टर २८ या तिन्ही ठिकाणच्या मलउदंचन केंद्रांच्या बांधकामाची पाहणी करीत ही कामे जलद गतीने गुणवत्ता राखून पूर्ण करण्याचे निर्देश दिले. केंद्र सरकारच्या अमृत २.० अंतर्गत ही कामे केली जात असल्याने विहित कालमर्यादेमध्ये ही कामे पूर्ण होतील याची काळजी घेण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

अशाच प्रकारे अमृत २.० योजनेअंतर्गत सुरू असलेल्या सेक्टर १९ कोपरखैरणे येथील धारण तलावाच्या कामाला गती देण्याचे निर्देश देतानाच त्याठिकाणी बांधण्यात येत असलेल्या मलनि:स्सारण केंद्राच्या देखभाल - दुरूस्ती कामाचेही आत्ताच नियोजन करून ठेवण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. हा तलाव मध्यवर्ती असून या ठिकाणी नागरिक मोठ्या संख्येने येत असतात हे लक्षात घेत येथे नागरिकांच्या विरंगुळ्यासाठी बोटींग व इतर सुविधा उपलब्ध करून द्याव्यात आणि या महसूलातून केंद्राचा देखभाल - दुरूस्ती खर्च होईल अशा प्रकारच्या नियोजनाची खातरजमा करून घ्यावी अशा सूचना त्यांनी केल्या.

या पाहणी दौ-यात वाशी सेक्टर १० येथील भूमीगत व उच्चस्तरीय जलकुंभ कामाचीही पाहणी करीत आयुक्तांनी हे काम जलद पूर्ण करावे तसेच जलवितरणाच्या चाचणीचेही आत्तापासूनच नियोजन करून ठेवावे असे सूचित केले.

पाणीपुरवठा आणि सांडपाणी व्यवस्थापन या दोन्ही बाबी महत्वाच्या असून त्या लवकरात लवकर नागरिकांसाठी उपयोगात येतील अशाप्रकारे या कामांचे नियोजन करावे असे निर्देश नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी पाहणी दौ-याप्रसंगी दिले.

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग; आरोपीला अटक

**महाड : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील धक्कादायक घटना घडली आहे. कांबळे तर्फे महाड मधील ऐश्वर्या हेअर कटिंग सलून मध्ये एका सात वर्षीय अल्पवयीन मुलीवर विनयभंगाची घटना उघडकीस आली आहे

आरोपी विलास पांडुरंग हुलालकर (वय ४८वर्षे) राहणार वरंडोली नाते, सध्या ईसाने कांबळे रहात होता. दुपारच्या सुमारास सलून दुकानांच्या समोर सात वर्षीय पीडित बालिकेला खाऊला पैसे देण्याच्या निमित्ताने ऐश्वर्या हेअर कटिंग सलूनमध्ये बोलावून विनयभंग केल्याप्रकरणी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आले आहे पुढील तपास महाड शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक संतोष जाधव पुढील तपास करीत आहेत.

# मराठी साहित्य मंडळातर्फे आधारवड सन्मान प्रदान

**पेण : प्रतिनिधी**

'मराठी साहित्य मंडळ पेण' संस्थेच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून खालील ज्येष्ठ सभासदांचा, नागरिकांचा सन्मान जागतिक मातृदिनी करण्यात आला.

मराठी साहित्य मंडळाच्या विविध उपक्रमांत नेहमीच एक हात मदतीचा' संस्थेस देणाऱ्या जेष्ठ लेखक कवी आणि अनेक संस्थांच्या विविध पदांवर कार्यरत राहून मराठी भाषा संवर्धनास हातभार लावणाऱ्या दीनानाथ पाटील, महात्मा गांधी मंदिर ग्रंथालय पेणचे अध्यक्ष अरविंद तथा अण्णा वनगे आणि मराठी साहित्य मंडळ पेणचे माजी अध्यक्ष नारायण सुर्वे यांना त्यांच्या निवास स्थानी जावून सन्मानपत्र,शाल,श्रीफळ देऊन 'आधारवड' म्हणून सन्मानित करण्यात आले.

मंडळाचे विद्यमान अध्यक्ष डॉ. देवीदास बामणे,उपाध्यक्ष प्रा.सतीश पोरे,सचिव वैभव धनावडे आणि या उपक्रमाचे संकल्पनाकार माजी सचिव बाळकृष्ण कमळकर यांच्या हस्ते सन्मान बहाल करण्यात आला.सदर प्रसंगी कवि दीनानाथ पाटील यांनी जागतिक मातृदिनाचे औचित्य साधून 'आई' विषयावरील गेय कविता भावपूर्णरीत्या सादर केली.अण्णा वनगे आणि नारायण सुर्वे यांनी गत कार्यक्रमांच्या आठवणी जागृत केल्या.



# नेरूळमध्ये झोपड्यांवर महापालिकेची कारवाई



**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत कारवाई करण्यात आली. अनधिकृत झोपडयांवर निष्कासन करण्यात आल्या.

बेलापुर विभागाअंतर्गत सेक्टर-२८, नेरुळ नवी मुंबई विठ्ठल रुक्मीणी मंदिरासमोरील सिडकोच्या भुखंडावरील अनधिकृत झोपडया स्वत:हून हटविने आवश्यक होते. सदर झोपड्या स्वत:हून न हटविल्यामुळे विभाग कार्यालय बेलापूर या कार्यालयामार्फत कारवाई करण्यात आली. या धडक मोहिमेसाठी बेलापूर विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. अमोल पालवे, कनिष्ठ अभियंता आत्माराम काळे उपस्थित होते

# प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशव्यांची वाहतूक करणाऱ्या टेम्पोवर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

परिमंडळ-१ विभागाच्या भरारी पथकाने उपायुक्त सोमनाथ पोटरे यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा रचून एकल वापरातील प्लास्टिक पिशव्यांची वाहतूक करणा-या छोटया टेम्पोवर कारवाई केली. यामध्ये आढळलेले ५० किलो वजनाच्या प्लास्टिक पिशव्यांचे गठ्ठे जप्त करण्यात आले. तसेच रू. ५०००/- दंडात्मक रक्कमही वसूल करण्यात आलेली आहे.

अशाचप्रकारे परिमंडळ २ चे उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनानुसार परिमंडळ २ च्या भरारी पथकाने से.११ घणसोली येथील बी मार्ट मध्ये प्लास्टिक पिशव्यांचा वापर आढळल्याने तेथे उपलब्ध प्लास्टिक पिशव्या जप्त केल्या असून रू. ५०००/- दंडात्मक रक्कमही वसूल केलेली आहे.



त्याचप्रमाणे परिमंडळ २ च्या भरारी पथकाने आज से.६, ऐरोली येथील तपासणीत महालक्ष्मी फास्ट फूड या ठिकाणी प्लास्टिक पिशव्यांचा वापर असल्याचे आढळल्याने त्यांच्याकडून रू. ५०००/- इतकी रक्कम दंड स्वरुपात वसूल केली असून त्यांच्याकडे असलेला १ किलो प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त केलेला आहे.

प्रतिबंधात्मक प्लास्टिकचा व त्यातही प्राधान्याने आढळणारा प्लास्टिक पिशव्यांचा वापर नागरिकांकडून थांबावा याकरिता नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येत असून पर्यायी कापडी व कागदी पिशव्यांचा वापर केला जावा यावर भर देण्यात येत आहे. तसेच प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीमांव्दारेही बाजारात वापरल्या जाणा-या प्रतिबंधात्मक प्लास्टिकवर दंडात्मक कारवाई करुन नियंत्रण आणले जात आहे.

तरी प्लास्टिकमुळे पर्यावरणाला व मानवी जीवनाला असलेला धोका लक्षात घेऊन नागरिकांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशव्यांचा व प्लास्टिक वस्तूंचा वापर पूर्णपणे टाळावा, असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

# वाशीत बालनाट्य शिबिराचा उत्साहात समारोप



**नवी मुंबई : बातमीदार**

संत शिरोमणी कला मंच नवी मुंबई आणि नवी मुंबई बालरंग भूमी यांच्या संयुक्त विद्यमाने बालनाट्य शिबिराचे आयोजन २ मे ते ११ मे या कालावधीमध्ये करण्यात आले होते. या बालनाट्य शिबिराचा समारोप सोमवार दिनांक १२ मे रोजी सकाळी अकरा वाजता विष्णुदास भावे नाट्यगृह वाशी येथे संपन्न झाला.

या प्रसंगी सुलेखनकार पद्मश्री अच्युत पालव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्याचबरोबर नाटक सिनेमा लेखक मुकुंद महाले गायक आणि निर्माते सुनील वाडकर, पालक प्रतिनिधी सुशीला शार्दुल विशेष सहकार्य करणाऱ्या अर्चना खरात या उपस्थित होत्या.

गेली अठ्ठावीस वर्षे ज्येष्ठ रंगकर्मी व शिबिर मार्गदर्शक श्रीहरी पवळे दिवाळी आणि उन्हाळी सुट्टीतील बालनाट्य शिबिराचे आयोजन करीत असतात. सदर बालनाट्य शिबिराचे उद्घाटन २ मे रोजी लेखक दिग्दर्शक सुप्रसिद्ध अभिनेते संतोष पवार यांच्या हस्ते संपन्न झाले होते. बालनाट्य शिबिर समारोप प्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते प्रमाणपत्र देऊन शिबिरार्थींना गौरविण्यात आले.

या शिबिरातून शिकून गेलेला व यशस्वी वाटचाल करत असलेल्या माजी विद्यार्थ्याला संस्थेतर्फे एकलव्य पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते तो सन्मान यावर्षी माजी विद्यार्थी श्री.राहुल अहिरे यांना सुलेखनकार पद्मश्री अच्युत पालव यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना समाजात चांगली मूल्य रुजली पाहिजे म्हणून विद्यार्थ्यांबरोबर पालकांचे शिबिर घ्या ज्या पालकांच्या या कलाक्षेत्रातील आपलं स्वप्न अपूर्ण असेल त्यानिमित्ताने ते पूर्ण होईल असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष सुलेखनकार पद्मश्री अच्युत पालव यांनी केले.

या बालनाट्य कार्यशाळेत स्वयंशिस्त,नाटकाच्या विविध अंगाचा अभ्यास, सर्वांगीण विकास शिस्तीचे धडे श्रीहरी पवळे यांनी दिले. यावेळी प्रशिक्षणार्थींनी बालनाटिका बालनाटिका सादर करून पालकांची आणि प्रेक्षकांची मने जिंकली.

# विनायकनामा व कुसुम पुस्तकाचे प्रकाशन

**नवी मुंबई :** लेखन आणि मी साहित्य, कला प्रतिष्ठान कोल्हापूरच्यावतीने गणेश मंदिर संस्थान डोंबिवली पूर्व येथील वरद सभागृहात रमेश पाटील लिखित 'विनायकनामा' व रफिक इनामदार लिखित 'कुसुम अशा दोन पुस्तकाच्या आयोजित प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला होता.

या वेळी नवी मुंबई पोलिसा दलाचे अधिकारी समाजभूषण उत्तम तरकसे, श्रीमंत संभाजीराव जाधवराव, नरेंद्र कदम, सुभाष नाईक, लेखक उद्योजक व सोनाली फडके उपस्थित होते. या सर्वांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

प्रकाशन सोहळ्यात समाजभूषण उत्तम तरकसे यांनी आपले विचार मांडले, ते म्हणाले की आपला भारत देश हा जगाला शांतीचा मार्ग दाखवणाऱ्या तथागत भगवान गौतम बुद्धांची जन्मभूमी आहे. शस्त्र उचलण्याची कोणाला वेळच येऊ नये असे मोलाचे विचार मांडले.

## दुखवटा

### सुमन रसाळ



**मोहोपाडा :** पंचशीलनगर येथील सुमन अमृत रसाळ यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६५ वर्षाच्या होत्या. त्यांची परिसरात भूरी मावशी म्हणून ओळख होती. त्यांचा दशक्रिया विधी शनिवार दि.१७ मे रोजी श्रीक्षेत्र गुळसूंदे येथे होणार असून उत्तरकार्य मंगळवार दि. २० मे रोजी राहत्या घरी पंचशीलनगर मोहोपाडा येथे होणार आहेत,त्यांच्या पश्च्यात एक मुलगा व दोन मुली असा परिवार आहे.

### बाळाराम मुंबईकर



**पनवेल :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पनवेल महानगरपालिका सह संपर्कप्रमुख बाळाराम मुंबईकर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांनी तळोजा भोईरपाडा येथील राहत्या घरी वयाच्या ६८ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. ते वारकरी संप्रदायाचे अनुयायी होते.

## निवडक

### घरफोडीत लाखोंचा ऐवज लंपास

**पनवेल :** खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका सोसायटीमधील एका घराच्या दाराचा कडी कोयंडा तोडून अज्ञात चोरट्याने घरातील साडेतीन लाख रुपयांचे सोन्याचे दागिने आणि रोख रकम चोरून नेल्याची घटना घडली. श्रीकांत पाटेकर हे न्यू राजहंस सोसायटी, आदई येथे राहतात. ते दरवाजाला कुलूप लावून कामानिमित्त बाहेर गेले होते. ही संधी साधत चोराने त्यांच्या घरात प्रवेश करून तेथून ३० ग्राम वजनाचे सोन्याचे दागिने आणि एक लाख दहा हजार रुपये चोरून नेले. पाटेकर हे काम आटपून घरी परतले असता घरात चोरी झाल्याचे त्यांना आढळले. त्यावर त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली त्यानुसार पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा नोंद करून त्याचा शोध सुरू केला आहे.

### खिशातून किमती ऐवज चोरी

**पनवेल :** खारघर टोल नाक्याच्या मागे पुणे-मुंबई लेनवरील नाल्याच्या मागे दुचाकीवर झोपलेल्या ३० वर्षीय तरुणाच्या खिशातून मोबाईल, सोन्याची चेन आणि पैशांची चोरी केल्याप्रकरणी अनोळखी चोरट्याविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सिद्धेश रेशीम हा सेक्टर-१५ खारघर येथे राहत असून, तो मेकॅनिक आहे.

### घरातून लॅपटॉपची चोरी

**पनवेल :** घरात प्रवेश करून चोराने चार लॅपटॉपची चोरी केली. या प्रकरणी कळंबोली पोलीस तपास करत आहेत. सिद्धार्थ भैय्या, तेजस वाघ, सुमित वंजारी, भूपेंद्र चौधरी (सर्व रा. आलम) हे कळंबोली येथे रूम मेट म्हणून राहतात. ते जेवण करून रात्री झोपले. नऊ मे रोजी सकाळी त्यांना रूमचा दरवाजा उघडा दिसला. चोराने दरवाजातून आत प्रवेश करून चार लॅपटॉप चोरून नेले.

# कळंबोली सर्कलच्या पनवेल एक्झिटचे काम वेगात

## लवकरच एक मार्ग वाहतुकीसाठी होणार खुला; वाहनचालकांकडून समाधान

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळाकडून कळंबोली जंक्शनची नव्याने सुधारणा करण्यात येत आहे. त्यासाठी कळंबोली सर्कल येथे नव्याने उड्डाणपुल व भुयारी मार्गाचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामामुळे कळंबोली सर्कल येथे वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील मुंबई वाहिनीवरील पनवेल एग्झिट ११ फेब्रुवारीपासून सहा महिन्यांपासून बंद ठेवण्यात आला आहे. सध्या येथील काम अंतिम टप्प्यात आले असून लवकरच वाहतुकीसाठी खुला होणार आहे.

लवकरच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू होणार असून या पूर्वी रस्ते जोडणीचे काम आता जलदगतीने सुरू झाले आहे. कळंबोली जंक्शनवर होत असणाऱ्या वाहतूक कोंडीमधून वाहनचालकांना दिलासा मिळणार आहे. सध्या हे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. खोदकाम करायला सुरुवात केली असून सर्व यंत्रणा जलदगतीने कामाला लावली आहे. पुलाचे पायाभरणीचे काम सुरू असून जवळपास शंभर फाईल फाउंडेशन म्हणजेच स्तंभ झाला आहे. दरम्यान, एनएचएआय आणि सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने, टीआयपीएल पनवेल यांच्यामार्फत हे काम सुरू आहे.

### वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग

*मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरून पनवेल, गोवा, जेएनपीटीकडे जाणार्या सर्व प्रकारच्या वाहनांना कोनफाटा (किमी ९.६००) येथे डावीकडे वळण घेऊन एनएच ४८ मार्गावरून पळस्पे सर्कल येथून इच्छितस्थळी जाता येणार आहे. तसेच मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरून (पनवेल एग्झिट) येथून तळोजा, कल्याण - शिळफाट्याकडे जाणार्या सर्व प्रकारच्या वाहनांना सरळ पनवेल-शीव महामार्गावरून पुरुषार्थ पेट्रोलपंप उड्डाणपुलाखालून उजवीकडे वळण घेऊन रोडपाली येथून एनएच ४८ महामार्गावरून इच्छितस्थळी जाता येणार आहे.*

### असे होतील फायदे

*कळंबोली जंक्शन अपग्रेड करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. रस्ते विकास महामंडळ नोडल एजन्सी असून याकरता केंद्रीय रस्ते विकास विभागाकडून ७७० कोटी रुपयांचा निधी देण्यात आलेला आहे. यामुळे हे वाहतूक सिग्नल आणि ट्रॅफिक फ्री होणार आहे. त्यामुळे तासनतास वाहनांना अडकून पडावे लागणार नाही. क्रॉस कॉनफ्लेक्टसुद्धा दूर होणार आहे.*

### ट्रॅफिक समस्येचा तिढा सुटणार

*परिणामी वेळ आणि इंधन वाचणार आहे. तर माती परीक्षणाचे काम सुद्धा युद्ध पातळीवर सुरू आहे. या व्यतिरिक्त कामामध्ये कोणताही व्यत्यय येऊ नये यासाठी सहा महिन्यांसाठी मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर पनवेल एक्झिट बंद करण्यात आली आहे. नवी मुंबईची स्वागतकमान असणाऱ्या या कळंबोली जंक्शनचे रूपडे पालटणार आहे. आता ट्रॅफिक समस्येचा तिढा सुटणार आहे.*



# पनवेल शहरात रस्त्यांचे डांबरीकरण

## दर्शना भोईर यांनी केली पाहणी





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली व माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे पनवेल शहरातील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात येत आहे. यामध्ये भारत बँकेपासून प्रभू आळी तसेच मारूती मंदिर आणि दांडेकर हॉस्पिटल येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात आले. या कामाची पाहणीवेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर, तसेच तुषार कापरे, चंद्रकात कुरघोडे, कल्पना देवरुखकर, राजन भालेकर, निलेश निकम आणि शैला खाडे आदी उपस्थित होते.



**पनवेल : महापालिकेच्या वतीने नवीन पनवेल आदई सर्कलजवळील राजीव गांधी मैदानावर दिलीप वेंगसरकर क्रिकेट अॅकडमी सुरू करण्यात आली आहे. या अॅकडमीमध्ये महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन अंतर्गत निमंत्रितांच्या सामन्यांचे आयोजन करण्यात आले आहे. रायगड विरुद्ध युनायटेड क्लब पुणे या संघांतील पहिला सामना गुरुवारी भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सुरू झाला. या सामन्याची नाणेफेक भाजपचे पनवेल शहराध्यक्ष सुमित झुंजारराव यांच्या हस्ते करण्यात आली. या सामन्याच्या निमित्ताने पनवेलमधील क्रिकेटप्रेमींना उच्च दर्जाचा क्रिकेट खेळ पाहण्याची संधी मिळाली.**

# कोंबिंग आणि ऑल आऊटद्वारे कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये पोलिसांच्या विशेष पथकाने कोंबिंग ऑपरेशन तसेच ऑल आऊट केल्याने मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली.

पोलीस उपायुक्त, परिमंडळ २चे प्रशांत मोहिते, सहा.पोलीस आयुक्त, पनवेल विभागचे अशोक राजपूत, वपोनि नितीन ठाकरे, पो. नि.शाकीर पटेल व अभंग यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत नवनाथ नगर झोपडपट्टी, रेल्वे स्टेशन परिसर या भागामध्ये कोंबिंग आपरेशन तसेच ऑल आऊट दरम्यान मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली.



यामध्ये एनडीपीएस सेवन अंतर्गत एकावर कारवाई, बेकायदेशीररित्या दारूविक्री संदर्भात तीघांवर कारवाई, मोटार वाहन कायदा मोडणाऱ्यांवर कारवाई, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या तीघा जणांवर कारवाई करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शिवशंभू नाका येथे नाकाबंदीदरम्यान ७९ वाहने चेक करण्यात आली असून एकुण २७ वाहनांवर मोटार वाहन कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात आली होती. तसेच नवनाथ नगर झोपडपट्टी व रेल्वे स्टेशन परिसर येथे कोंबिंग ऑपरेशन राबवून सदर ठिकाणी परकीय नागरिक अथवा बांगलादेशी नागरिक यांचा शोध घेण्यात आला.

हॉटेल, लॉज तपासणी करण्यात आली. या कारवाई दरम्यान, आठ सपोनि/पोउपनि, २१ अमलदार, आरसीपी पथक असे सहभागी झाले होते.

# छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

स्वराज्य प्रतिष्ठान सामाजिक संघटना भिंगारी कुंभारवाडा यांच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज जयंती विविध कार्यक्रमांसह मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल मनपा माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, एपीआय श्रीकांत शेडगे, केदार भगत, जितेंद्र फडके, रवी शेळके, अजय बहिरा, सुनील बहिरा आदी उपस्थित होते. या वेळी बाळ संभाजीच्या वेशात असलेला अर्चिस राकेश वाडेकर यांनी सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले.



शिवप्रतिमांचे पुजनानंतर शिवशाहीर अभिषेक पाटील आणि सहकारी यांचे पोवाडे ऐकण्यासाठी मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. यानंतर महिलांचा हळदीकुंकवाचा कार्यक्रम झाला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ऐतिहासीक वाघ नखांच्या चांदीच्या प्रतिकृतीचे लोकार्पण करण्यात आले. यानंतर शिव सुर्य मर्दाणी आखाडा यांच्याकडून शस्त्रांचे साहसी खेळाचे प्रात्यक्षिक करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वराज्य प्रतिष्ठानच्या संस्थापक रंजना राकेश वाडेकर, अध्यक्ष पुनम विशाल जाधव, उपाध्यक्ष प्रतिभा संदेश परब, दिपाली मनोज कळमकर, दिप्ती अलंकार कुंभार, अंकीत मोहन मांगरुळकर, अमृता अमोल निर्गुण, सुबोध प्रभाकर माने, वैभव मढवी आदीनी अथक परिश्रम घेतले.



**पनवेल : अविनाश कोळी यांच्या कार्याची दखल घेत भाजप प्रदेश कार्यालयाने त्यांची पुन्हा एकदा पक्षाच्या उत्तर रायगड जिल्हा अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. याबद्दल त्यांना पनवेल महापालिका प्रभाग क्रमांक १८च्या वतीने ओबीसी मोर्चा सोशल मीडिया सेल जिल्हा प्रभारी तथा शहर संयोजक प्रसाद हनुमंते, भाजप शहर उपाध्यक्ष प्रीतम म्हात्रे, प्रभाग अध्यक्ष महेश सरदेसाई, प्रसाद म्हात्रे, नरेंद्र सोनवणे, सुधीर देसाई, चंद्रकांत पाटील आदींनी शुभेच्छा दिल्या.**

# ज्येष्ठाला कोट्यवधीचा गंडा

**पनवेल :** खारघर येथे राहणाऱ्या सेवानिवृत्त ज्येष्ठ नागरिकाची भामट्यांनी तब्बल एक कोटी पाच लाख रुपयांची ऑनलाईन फसवणूक केली.

खारघर येथील सेक्टर २० मधील ट्विन्स सोसायटीमध्ये ६४ वर्षांचे जेष्ठ नागरिक राहतात. ते एका खासगी कंपनीच्या उपाध्यक्ष या पदावरून सेवानिवृत्त झाल्यावर त्यांनी आयुष्यभरात कमावलेली रक्कम बँक खात्यात जपून ठेवली होती. संबंधित ज्येष्ठाला शेअर्स ट्रेडिंगमधून जास्तीचा नफा मिळवून देतो असे आमिष दाखवून विविध बँक खात्यात रक्कम गुंतविण्यास सांगितले. त्यांनी बँकेत जमा केलेली रक्कम भामट्यांनी तयार केलेल्या बनावट संकेतस्थळावर दर्शविण्यात आली, परंतु ज्यावेळेस गुंतवलेली रक्कम काढण्यासाठी या ज्येष्ठ नागरिकाने प्रयत्न केला त्यावेळी ती रक्कम परत मिळाली नाही. नवी मुंबई पोलिसांच्या सायबर पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कदम हे या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.

# ओरियन मॉलमध्ये विज्ञान प्रदर्शन

**पनवेल : वार्ताहर**

नेहरू सायन्स सेंटर यांच्या सहकार्याने ओरियन मॉल, पनवेल येथे २५ मे २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या विज्ञान प्रदर्शनात भेट देण्यासाठी व सहभाग घेण्यासाठी आवाहन ओरियन मॉलच्या वतीने मंगेश परुळेकर व मनन परुळेकर यांनी केले आहे. हे विशेष प्रदर्शनी विज्ञान शिक्षणामध्ये जिज्ञासा वाढवण्यासाठी आणि नवकल्पनांना चालना देण्यासाठी राबवण्यात आलेल्या उपक्रमाचा एक भाग आहे. विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांसाठी हे प्रदर्शन म्हणजे विज्ञानाच्या मनोरंजक, शैक्षणिक आणि प्रेरणादायी सादरीकरणाचा अनुभव घेण्याची एक अनोखी संधी आहे.




## संपादकीय

# तुर्कस्तानची तडफड

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे २६ निष्पाप पर्यटकांची दहशतवाद्यांनी निर्घृण हत्या केल्याचा बदला घेण्यासाठी भारताच्या सशस्त्र दलांनी अतिशय समर्थपणे 'ऑपरेशन सिंदूर' राबवले. भारताने दहशतवादाविरोधात पुकारलेल्या या युद्धाला जगभरातील बहुतांश देशांनी पाठिंबा दर्शवला. परंतु तुर्कस्तान आणि अझरबैजान या दोन देशांनी मात्र भारतविरोधी भूमिका घेत पाकिस्तानची साथ दिली. त्यामुळे या दोन देशांविरुध्द भारतीय जनतेने आता उत्स्फूर्तपणे बहिष्काराची हाक दिली आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कुशल नेतृत्वाखाली भारतीय लष्कराने 'ऑपरेशन सिंदूर' किती समर्थपणे पार पाडले हे जगाने पाहिले. ऑपरेशन सिंदूरने पाकिस्तानचे हवाई सामर्थ्य किमान २० टक्क्यांनी कमी केले आहे. एकंदरच लष्करी ताकदीत आता पाकिस्तान किमान ३० वर्षे मागे लोटला गेल्याचे युद्धतज्ज्ञ सांगतात. ऑपरेशन सिंदूरमधून भारताच्या लष्करी सामर्थ्याचे दर्शन जगाला घडले आहे. भारताशी शत्रुत्व पत्करण्याची किंमत पाकिस्तानला यापुढेही मोजावी लागेल. या काळात भाराताविरोधात भूमिका घेऊन पाकिस्तानची साथ देणाऱ्या तुर्कस्तान आणि अझरबैजान या देशांनाही ती मोजावी लागेल. या देशांनी पाकिस्तानला उघड पाठिंबा दिला. त्यांनी भारताशी अशात्ऱ्हेने अकारण शत्रुत्व का पत्करले असावे हे उघड झालेले नाही. तुर्कस्तानने पाकिस्तानला केवळ राजनैतिक नव्हे तर लष्करी मदतही केली. तुर्की ड्रोन वापरून पाकिस्तानने भारतातील नागरी व लष्करी ठिकाणांवर हल्ले केले. इस्लामी देश म्हणून अन्य इस्लामी देशांनी पाकिस्तानला पाठिंबा देणे स्वाभाविक मानले तरी तुर्कस्तान आणि अझरबैजान वगळता अन्य कुठल्याही इस्लामी राष्ट्राने तसे केलेले नाही. तुर्कस्तानने तर पाकिस्तानला क्षेपणास्त्रेही पुरवली. अझरबैजाननेही सक्रीय मदत केली. परिणामस्वरूपी तुर्कस्तान आणि अझरबैजान विरोधात भारतीय जनतेकडून आता निषेधाची तीव्र प्रतिक्रिया येते आहे. भारतीय व्यापाऱ्यांनीही उत्स्फूर्तपणे तुर्की उत्पादने आणि व्यापारी व्यवहारांवर बहिष्कार टाकण्याचे पाऊल उचलले आहे. कलाकार, व्यापारी, खेळाडूंसह सगळ्यांमध्येच प्रचंड चीड आहे. देशभरात 'बॉयकॉट तुर्की' अभियान सुरू झाले आहे. भारत तुर्कस्तानला अनेक गोष्टी निर्यात करतो. पोलाद उत्पादनात तर भारत जगातील दुसऱ्या क्रमांकाचा निर्यातदार आहे. भारताला तुर्कस्तानला निर्यात थांबवल्याची फारशी किंमत मोजावी लागणार नाही हे उघड आहे. अझरबैजान हा तर अगदीच नगण्य देश आहे. तुर्कस्तानकडून भारतात ताजी सफरचंदे, संगमरवरी टाइल्स आयात केल्या जातात. हा सारा व्यवहार भारतीय व्यापारी आणि उत्पादकांनी ताबडतोब थांबवला आहे. तुर्कस्तानवर बहिष्कार टाकण्यात भारतीय पर्यटकही आघाडीवर आहेत. या दोन्ही देशांसाठीच्या बुकिंगमध्ये ६० टक्क्यांनी घट झाली आहे. हे सारे उत्स्फूर्तपणे घडते आहे. जेएनयू व अन्य विद्यापीठांनी तुर्की विद्यापीठांसोबतचे करार रद्द केले आहेत. भारतीय नागरिकांनी देशाच्या पाठिशी एकजुटीने उभे राहायला हवे अशी भावना व्यक्त होते आहे. भारतीयांची ही एकजूट व देशप्रेम जगभरातील देश पाहात आहेत. देशासाठी उत्स्फूर्तपणे वैयक्तिक झळ सोसण्याची तयारी भारतीय नागरिक, व्यापारी व पर्यटन कंपन्या दाखवित आहेत. पाकिस्तानला पाठिंबा दिल्याचा जबरदस्त दणका तुर्कस्तान आणि अझरबैजानला सामान्य भारतीय जनतेकडूनच मिळतो आहे. भारतीय लष्कराचा दणका तर त्यांना सोसवणारच नाही. पाकिस्तानने वर्षानुवर्षे दहशतवादाला खतपाणी घातले आहे. त्या बळावरच धर्म विचारून भारतीय पर्यटकांना गोळ्या घालणाऱ्या दहशतवाद्यांना भारतीय लष्कराने जन्माची अद्दल घडवली आहे. आता भारतीय जनतेच्या बहिष्काराने तुर्कस्तानलाही अद्दल घडेल यात शंका नाही.**

# महिला कबड्डी संघांनीही वेळेचे भान राखावे!




**खबरबात**
प्रकाश सोनवडेकर

रायगड जिल्हा म्हणजे कबड्डीचे माहेरघर समजले जाते. येथे कबड्डीच्या जेवढ्या स्पर्धा होतात तेवढ्या स्पर्धा अन्य जिल्ह्यात होत नाहीत, परंतु याच जिल्ह्यात कबड्डी स्पर्धेत जेवढ्या भानगडी होतात तेवढ्या भानगडी इतर कोणत्याही जिल्ह्यात होत नाहीत. या जिल्ह्यातील कबड्डी खेळाडूमध्ये दिवसेंदिवस बेशिस्तपणा वाढत आहे. स्पर्धेच्या ठिकाणी हे खेळाडू कधीच वेळवर पोहचत नाहीत. पुरुष खेळाडूंप्रमाणे महिला खेळाडूंमध्येदेखील बेशिस्तपणा वाढत चालला आहे. महिला संघदेखील वेळचे भान राखत नाही.

पूर्वी महिला कबड्डी स्पर्धा वेळेत सुरू होत असे. आत या महिला खेळाडू देखील स्पर्धेच्या ठिकाणी उशीरा पोहचतात. पहाटेपर्यंत स्पर्धा सुरू राहते. यामुळे रायडच्या कबड्डीची बदनामी होतेय. खेळाडूंच्या उशीरा येण्यामुळे आयोजकांची काय अवस्था होते याचा विचार पुरूष आणि माहिला खेळाडूंनी देखील केला पाहिजे. रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनने याबात कडक भूमिका घ्यायला हवी.

मी स्वतः ४ मे रोजी चिंतामणराव केळकर विद्यालयाच्या मैदानावर सिंधुरत्न करंडक जिल्हास्तरीय महिला कबड्डी स्पर्धा आयोजित केली होती. त्यात महिलांच्या संघांचा मला वाईट अनुभव आला. स्पर्धेच्या उद्घाटनाची वेळ सायंकाळी ४ वाजता देण्यात आली होती. प्रत्येक संघाला पत्र पाठवल होत. भ्रमणध्वनीवरून संपर्क साधण्यात आला होता. महिला स्पर्धा असल्यामुळे स्पर्धा वेळेत सुरू करायची आहे आणि रात्री १० वजोपर्यत्न संपवायची आहे त्यामुळे वेळेवर उपस्थित रहा अशी विनंती केली होती. स्पर्धेच्या दिवशी मी स्वतः ३.३० वाजता मैदानात उपस्थित होतो. सर्व तयारी केली होती. निरीक्षक आले होते. परंतु संघच मैदानात हजर नव्हते. संघ येतोय की नाही हे देखील कळविण्याच तस्ती घेतली नाही. आपवाद दिवेआगरचा सुवर्णगणेश संघ. या संघाने आम्ही निघालोय. असे कळवले. ७ वाजेपर्यंत स्पर्धा हाईल की नाही अशी परिस्थीती.

महिला संघ असल्यामुळे प्रवेशशुल्क घ्यायचे नाही. जे संघ बक्षीसपात्र ठरणार नाहीत त्यांना प्रवास भाडे द्यायचे. महिला असल्यामुळे द्याव्या लागणार्या इतर सुविधा द्यायच्या. स्पर्धा वेळेत संपवावी यासाठी दोन क्रीडांगणे तयार करायची. स्पर्धा वेळेत सुरू व्हावी म्हणून आदल्यादिवशीच सर्व तयारी करून ठेवायची. असे असताना केवळे संघ वेळेत आले नाहित म्हणून स्पर्धा उशीरा ती ही चार तास त्यामुळे स्पर्धा रद्द करावी असा विचार मनात आला होता. परंतु सर्व बाबींचा विचार करून तो निर्णय मी बदलला. स्पर्धा रात्री आठ वाजाता सुरू झाली. हे अती झाल. खेळाडूंनी व संघ प्रमुखांनी आयोजकांचा थोडा तरी विचार करायला हवा.

एकतर रायगड जिल्ह्यात महिलांच्या कबड्डी स्पर्धा होत नाहीत. जे लोक महिला खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी महिला कबड्डी स्पर्धा आयोजित करतात त्यांना जर असे वाईट अनुभव येत असतील तर आयोजक पुढच्यावेळी महिला कबड्डी स्पर्धा अयोजित करताना विचार करतील. ती वेळ येऊ द्यायची नसेल तर महिला खेळाडूंनी वेळचे भान पाळायलाच हवे. रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशने याबात ठोस निर्णय घ्यायाला हवा. या स्पर्धेत सहभागी झालेल्या बहुतांश महिला खेळाडूंनी रायगड जिल्ह्यात महिला कबड्डी स्पर्धा कमी होत असल्याचे सांगितले. अशा परिस्थितती ज्या स्पर्धा होतात तेथे तरी वेळेत पोहचण्याचा प्रयत्न खेळाडूंनी केला पाहिजे.

एक काळ असा होता की महिलांचे केवळ आठच संघ रायगड जिल्हा निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत खेळायचे. चाचणी झाली की महिलांच्या स्पर्धा होत नसत. काही वर्षांपासून महिलांचे संघ वाढले. रायगडने काही राष्ट्रीय खेळाडू दिल्या. परंतु पुन्हा रायगड जिल्ह्यात महिलांच्या कबड्डी स्पर्धाचे प्रमाण कमी झाले. पूर्वी पेण व आलिबाग तालुक्यातील महिला संघांचाच दबदबा आसायचा. आता पनवेल तालुक्यात चार महिला कबड्डी संघ आहेत. ही चागली बाब आहे. केवळ पनवेल तालुकाच नाही तर इतर तालुक्यात देखील महिलांचे कबड्डी संघा वाढले पाहिजे. त्यासाठी महिलांच्या कबड्डी स्पर्धा व्हायाला हव्यात. तरच रायगड जिल्ह्यात चांगल्या महिला खेळाडू तयार होऊ शकतात. रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनने त्यासाठी प्रयत्न करायाला हवेत. रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या प्रत्येक कार्यकरीणी सदस्याने आपल्या गावात दर वर्षी एक जिल्हास्तरीय महिला कबड्डी स्पर्धा आयोजित केली तरी भरपूर स्पर्धा होतील. महिलांच्या भरपूर स्थानिक स्पर्धा झाल्या. तर चांगले खेळाडू तयार होतील.

खरंच रायगड जिल्ह्यातील महिला कबड्डीपटूंचे भले व्हावे असे वाटत असेल तर रायगडचा महिला कबड्डी संघ निवडताना खेळाडूच्या केवळ चाचणी स्पर्धेतील कामगिरीचा विचार न करता वर्षभरात झालेल्या स्थानिक स्पर्धामंध्ये खेळाडूने केलेल्या कामगिरीचा देखील विचार केला पाहिजे. प्रत्येक स्पर्धेसाठी रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन निरीक्षक पाठवते. त्यांचे अहवाल येतात. त्यात खेळाडूंनी केलेल्या कामगरीची माहिती देखील निरीक्षकांकडून घ्याला हवी. निवड समितीमधील सदस्यांनी स्थानिक स्पर्धेच्या ठिकाणी जाऊन खेळाडूंचा खेळ पाहिला पाहिजे. हेच खेळाडू जिल्हा निवड चाचणीत खेळत असतात. जर निवड समितीधील सदस्य स्थानिक स्पर्धे च्या ठिकाणी उपस्थित राहीले तर खेळाडूंवर देखील त्याचा परिणाम हाईल. खेळाडू चांगला खेळ करण्याचा प्रयत्न करतील. जिल्ह्याचा संघ निवडताना जास्त अडचणी येणार नाहीत. रायगड जिल्ह्याचा महिलांचा चांगला कबड्डी संघ निवडता येईल.

## बदलते तंत्रज्ञान

# या चुकांमुळे एसीमध्ये होऊ शकतो स्फोट

एसीशी संबंधित निष्काळजीपणा खूप धोकादायक ठरू शकतो. म्हणूनच, जर तुमच्या घरात किंवा ऑफिसमध्ये एसी बसवले असेल तर काही खबरदारी घेणे आवश्यक आहे.



शशिकांत उपाध्याय, पॉवर इलेक्ट्रॉनिक्स अभियंता, अहमदाबाद म्हणतात उन्हाळा सुरू होताच, एसीचा वापर वाढतो, परंतु अनेकदा लोक त्याची सर्व्हिसिंग न करता किंवा त्याची तांत्रिक स्थिती तपासल्याशिवाय तो चालू करतात. अशा परिस्थितीत थोडासा निष्काळजीपणाही मोठा धोका बनू शकतो. मुळात, एसी हे एक उच्च-शक्तीचे इलेक्ट्रॉनिक उपकरण आहे. जर त्यात काही तांत्रिक बिघाड असेल किंवा वापरताना काळजी घेतली नाही, तर आगीचा धोका अनेक पटींनी वाढतो.

उन्हाळ्यात एसी अनेक तास सतत चालतो. जर त्याची सर्व्हिसिंग वेळेवर केली नाही किंवा अंतर्गत भाग कमकुवत असतील तर काही काळानंतर ते धोकादायक बनू शकते. तथापि, अशा अपघातांपूर्वी, एसी निश्चितच काही चेतावणी सिग्नल देतो. जर हे वेळीच ओळखले गेले, तर मोठे नुकसान टाळता येऊ शकते. एसीमधून येणारा जळल्याचा वास हा वायरिंग किंवा सर्किटमध्ये गरम होण्याचे लक्षण असू शकते.

ठिणग्या किंवा खडखडाट आवाज हे कॉम्प्रेसर किंवा विद्युत बिघाड दर्शवतात.एसीमधून येणारा धूर किंवा हलके धुके हा धोकादायक सिग्नल आहे. अशा परिस्थितीत, एसी ताबडतोब बंद करा. वारंवार चालू-बंद चक्र हे ओव्हरलोड किंवा व्होल्टेज चढ-उतारांमुळे सिस्टममधील बिघाडाचे लक्षण आहे.

एसी युनिट असामान्यपणे गरम होणे हे घटक जास्त गरम होण्याचे लक्षण आहे, ज्यामुळे आग लागू शकते.जर तुम्हाला यापैकी कोणतीही चिन्हे दिसली, तर ताबडतोब एसीचा मुख्य पुरवठा बंद करा आणि व्यावसायिक तंत्रज्ञांचा सल्ला घ्या. थोडीशी काळजी घेतली तर मोठा अपघात टाळता येऊ शकतो. उन्हाळ्यात एसी निश्चितच आराम देतो, परंतु त्याची काळजी आणि वापरात निष्काळजीपणा एक मोठा धोका बनू शकतो. आग, शॉर्ट सर्किट किंवा कंप्रेसरचा स्फोट यासारखे अपघात तेव्हाच घडतात, जेव्हा आपण काही मूलभूत सुरक्षा नियमांकडे दुर्लक्ष करतो. थोडीशी काळजी घेतल्यास उन्हाळ्यात तुम्हाला आणि तुमच्या कुटुंबाला सुरक्षित आणि आरामदायी वातावरण मिळू शकते.

# प्रसिद्ध भावगीत गायिका माणिक वर्मा



**निमित्त**

माणिक वर्मा या मराठीतील नामवंत भावगीत गायिका होत्या. त्यांचा जन्म १६ मे १९२६ रोजी बळवंत दादरकर आणि हिराबाई दादरकर यांच्या पोटी झाला. हिराबाईंनी आपल्या मुलीची संगीताची गोडी लहानपणीच ओळखली आणि त्यांना एक कुशल गायिका होण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण देण्याचा चंग बांधला, मात्र हा मार्ग सोपा नव्हता, कारण त्या काळी पारंपरिक संगीतामध्ये महिलांचा सहभाग निषिद्ध मानला जात होता.

माणिक वर्मा यांनी आपले प्रारंभिक प्रशिक्षण भारतीय गायन समाजात ज्येष्ठ गायक अप्पासाहेब भोपे यांच्याकडून घेतले. त्यानंतर ख्यातनाम गायक सुरेशबाबू माने, उस्ताद अझमत हुसेन खान, उस्ताद इनायत खान, भोलानाथ भट्ट आणि पं. जगन्नाथ बुवा पुरोहित यांच्याकडूनही पुढचे प्रशिक्षण घेतले. प्रख्यात गायिका हिराबाई बडोदेकर (सुरेशबाबू माने यांची बहीण) यांचादेखील माणिक वर्मा यांच्या गायकीवर प्रभाव होता. किराणा आणि आग्रा घराणा या दोन्हींचे प्रशिक्षण असले, तरी माणिकबाईंनी स्वत:ची गायकी आत्मसात करण्यावर भर दिला. हळूवार आवाजाची लय कायम ठेवत त्यांनी पुढे नाव कमावले. वयाच्या १३व्या वर्षी त्यांनी सार्वजनिक कार्यक्रमांना सुरुवात केली. अवघ्या १५ वर्षांच्या असताना त्यांनी पहिल्या ध्वनिमुद्रिकेसाठी पार्श्वगायन केले, तर वयाच्या १७व्या वर्षी सूरत येथे पं. ओंकारनाथ ठाकूर यांनी आयोजित केलेल्या मैफलीत त्यांचे पहिले भव्य सादरीकरण झाले. मुंबई विद्यापीठातून कला शाखेत शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी पुण्याच्या गांधर्व महाविद्यालयातून संगीताचा अभ्यास केला. १९४७मध्ये वयाच्या २१व्या वर्षी त्यांनी कोलकात्याची तानसेन मैफल स्वतःच्या कलावंतांच्या जोरावर गाजवली. तिथून पुढे त्या हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतातील दिग्गज कलाकार म्हणून गणल्या जाऊ लागल्या.

पं. भीमसेन जोशी, पु.ल. देशपांडे, सुधीर फडके, श्रीनिवास खळे, मनोहर जोशी, यशवंत देव, पं. सी.आर. व्यास, प्रमोद नवलकर, गजानन वाटवे, ज्योत्स्ना भोळे, शांता शेळके, अप्पा जळगावकर, दत्ता डावजेकर, जयमाला शिलेदार, प्रभाकर जोग, मालती पांडे, सुनीता देशपांडे, अरविंद गजेंद्रगडकर, शैला दातार, योगिनी जोगळेकर, राम गबाले, सुनीता खाडिलकर, दत्ता मारुलकर, मधुवती दांडे यांसारख्या सर्व स्तरांतील नामवंत व्यक्तींनी त्यांच्या कौशल्याची प्रशंसा केली. संगीतातील सखोल प्रशिक्षणामुळे त्या मराठी भावगीते, भक्तीगीते आणि नाट्यगीते गायनात पारंगत झाल्या. बालगंधर्वांच्या संस्मरणीय रचनांच्या ध्वनिमुद्रिका रेकॉर्ड करण्याचे श्रेयही माणिकबाईंना जाते.

आकाशवाणीने माणिकबाईंची भजने आणि भक्तीगीते सुरू करून श्रोत्यांची सकाळ प्रसन्न केली. त्यामुळे त्या महाराष्ट्राच्या घराघरात पोहचल्या. एप्रिल १९५५मध्ये त्यांची गाणी 'गीत रामायण' मालिकेचा भाग बनली. आकाशवाणी पुणे केंद्राने दर आठवड्याला वर्षभर हा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यांना त्यात ख्यातनाम गायिका लता मंगेशकर, योगिनी जोगळेकर, उषा अत्रे, बबनराव नवडीकर आणि सुधीर फडके यांचीही साथ लाभली.

माणिक बळवंत दादरकर यांनी १९४७मध्ये प्रख्यात लेखक आणि गीतकार अमर वर्मा यांच्याशी लग्न केले. या दाम्पत्याला चार मुली झाल्या. गायिका राणी वर्मा, अरुणा जयप्रकाश, प्रख्यात मराठी-हिंदी अभिनेत्री भारती आचरेकर आणि ख्यातनाम मराठी अभिनेत्री वंदना गुप्ते या चार मुलींनीही आपापल्या क्षेत्रात अमाप प्रसिद्धी मिळवली. माणिक वर्मा यांना विविध पुरस्कारांने सन्मानित करण्यात आले. वयाच्या ७०व्या वर्षी १० नोव्हेंबर १९९६ रोजी त्यांचे निधन झाले. (साभार : इंटरनेट)


## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# कडक उन्हात बाहेर पडताना खबरदारी घ्या!

देशाच्या अनेक भागात तीव्र उष्णता आहे. हवामान खात्याने अनेक राज्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा जारी केला आहे. या काळात लोकांना घराबाहेर पडू नये असा सल्ला देण्यात आला आहे.पण अनेक लोकांना त्यांच्या कामासाठी कडक उन्हात बाहेर जावे लागते. जेव्हा तापमान वाढत राहते आणि उष्णतेची लाट येते तेव्हा बाहेर पडणे अधिक धोकादायक बनते.



अशा हवामानात, डिहायड्रेशन, जुलाब, डोकेदुखी, त्वचेवर पुरळ यासारख्या समस्या सामान्य आहेत. या समस्यांपासून स्वतःचे रक्षण करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे जेव्हाही तुम्ही घराबाहेर पडाल तेव्हा पूर्ण सावधगिरीने आणि तयारीने बाहेर पडावे.

डॉ. बॉबी दिवाण म्हणतात उन्हाळ्यात घराबाहेर न पडणे चांगले. पण जर तुम्हाला बाहेर जावे लागले तर सर्वप्रथम, हलक्या रंगाचे, सैल आणि सुती कपडे निवडा, जे हवा सहजपणे जाऊ देतात आणि शरीर थंड ठेवतात. थेट सूर्यप्रकाश टाळण्यासाठी तुमचे डोके आणि चेहरा टोपी, स्कार्फ, टॉवेल किंवा इतर कोणत्याही कापडाने झाकायला विसरू नका.

हानिकारक अल्ट्राव्हायोलेट किरणांपासून तुमचे डोळे वाचवण्यासाठी सनग्लासेस घाला. जर तुम्हाला बराच वेळ उन्हात राहावे लागणार असेल, तर ओरल रिहायड्रेशन सोल्युशनचे काही पाउच सोबत ठेवा. निघण्यापूर्वी हलके आणि सहज पचणारे अन्न खा. दिवसाच्या सर्वात उष्ण वेळेत म्हणजे दुपारी १२ ते ३ च्या दरम्यान बाहेर जाणे टाळा. याशिवाय, इतर काही गोष्टी देखील लक्षात ठेवा.

सुती आणि सैल कपडे घाला. उन्हाळ्यात हलक्या रंगाचे कपडे घालल्याने सूर्याची किरणे परावर्तित होतात, ज्यामुळे शरीर कमी गरम होते. सैल कपडे शरीरातून हवा जाऊ देतात, ज्यामुळे थंडावा मिळतो. तसेच, पूर्ण बाह्यांचे कपडे त्वचेचे थेट सूर्यप्रकाशापासून संरक्षण करतात. तर सुती कपडे घाम शोषण्यास मदत करतात.टोपी किंवा रुमालाने डोके झाका. जेव्हा तीव्र सूर्यप्रकाश थेट डोक्यावर पडतो, तेव्हा उष्माघाताचा धोका वाढतो. अशा परिस्थितीत, टोपी किंवा रुमालाने डोके कडक उन्हापासून वाचवते आणि थंड ठेवण्यास मदत करते. पाण्याची बाटली ठेवा. उन्हाळ्यात शरीराला खूप घाम येतो, ज्यामुळे डिहायड्रेशन होऊ शकते. अशा परिस्थितीत, तुमच्यासोबत पाण्याची बाटली ठेवून तुम्ही वेळोवेळी पाणी पिऊ शकता आणि तुमचे शरीर हायड्रेट ठेवू शकता.

# रोह्यात शासन आपल्या दारी!

## २४०पेक्षा जास्त नागरिकांनी घेतला उपक्रमाचा लाभ

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तहसील कार्यालय, रोहा नगरपरिषद व सुराज्य सामाजिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिक सभागृह येथे बुधवार (दि. १४) रोजी आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान अंतर्गत शासन आपल्या दारी हा उपक्रम राबवण्यात आला तर कार्यक्रमाच्या माध्यमातून उत्पन्नाचा दाखला, डोमासाईल,नॉन क्रिमीलेअर, ई डब्ल्यू एस, जातीचा दाखला, नवीन मतदार नोंदणी,शिधापत्रिका, ऍग्रो स्टॉक नोंदणी यासारख्या विविध दाखले व योजनांचा २४३ नागरिकांनी लाभ घेतला.



यामध्ये काही दाखले तात्काळ देण्यात आले. सदर कार्यक्रमाला राज्यसभेचे खासदार धैर्यशील पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले. या कार्यक्रमासाठी उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड तसेच तहसीलदार वैशाली काकड,पांडुरंग मोकल,भाजप रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग, सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्ट अध्यक्ष चंद्रकांत पार्टे, माजी उपनगराध्यक्ष वसंत शेलार,सामाजिक कार्यकर्ते किरण मोहिते, अर्क्रोमा कंपनीचे अधिकारी उदय ओक , मंडळ अधिकारी भरत गुंड, नगरपरिषद अधिकारी विशाल काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे उद्घाटन पार पडले. उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांनी उपस्थित नागरिकांना शासकीय योजनांची माहिती देत या उपक्रमाचे महत्त्व सांगितले. तसेच कार्यक्रमाचे प्रस्तावना सुराज्य सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक रोशन चाफेकर यांनी केली.

कार्यक्रमाला विज्ञान सर, सुरेंद्र निंबाळकर, लीलावती हॉटेल मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटच्या प्रतिभा कोंडे, जयेश छेडा, शैलेश रावकर, पी व्ही सोनल कुमार, नरेश कोकरे यांच्यासह अनेक जणांनी उपस्थिती दर्शवली.

शैक्षणिक व अन्य बाबीसाठी लागणारे दाखले एकाच ठिकाणी मिळाल्यास नागरिकांना सोयीचे ठरते या दृष्टिकोनातून हा कार्यक्रम रोहेकरांसाठी फायदेशीर ठरला. रोहा तहसीलदार किशोर देशमुख तसेच रोहा शहर मुख्याधिकारी अजय एडके यांचेही यावेळी सुराज्यकडून धन्यवाद मानले. आकाश भिंगारे यांचेही कार्यक्रमाला सहकार्य लाभले.

# नागावच्या पाणीपुरवठ्यासाठी मंत्री गुलाबराव पाटील यांना साकडे

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील नागाव ग्रा.प.सरपंच हर्षदा मयेकर यांनी पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील यांना नागावच्या पाणीपुरवठा समस्यांची सोडविण्यासाठी प्रत्यक्ष भेट घेवून जलशुध्दीकरण प्रकल्पाची मागणी निवेदनाव्दारे केली आहे.

अलिबाग तालुक्यातील नागावमध्ये चार तलाव आहेत, त्यामध्ये नैसर्गिक पाणी असून या तलावाचे पाणी समस्त नागावकरांना शुध्द करून वापरण्यास मिळाले, तर नागाव गावाचा पाणी प्रश्न कायमस्वरूपी सुटू शकेल, त्यासाठी जलशुध्दीकरण प्रकल्पाची मंजुरी मिळावी, अशी मागणीचे निवेदन नागाव ग्रा.प. सरपंच हर्षदा मयेकर यांनी पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील यांना प्रत्यक्ष भेट देवून निवेदनाव्दारे केली.

या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्रात नागाव हे गाव पर्यटन क्षेत्र म्हणून प्रसिध्दीस आले आहे. या नागावमध्ये दररोज सरासरी २५ ते ३० हजार लोकांची वर्दळ असते. निसर्गाचे देणं असलेलं नागावला चार किमीचा सागरी समुद्र किनारा लाभला आहे. स्वच्छ, सुंदर व सुरक्षीत समुद्र किनारा म्हणून नागाव समुद्र किनारी मोठया संख्येने पर्यटक भेट देतात.

नागाव गावाची लोकसंख्या सन २०२४नुसार १२ हजार इतकी आहे. गावासाठी पाणीपुरवठा हा सध्या उमटे धरणातून होत असतो, मात्र उमटे धरणातदेखील आत तितका पाणीसाठा उपलब्ध नाही, त्या कारणाने नागाव ग्रामस्थांना जानेवारी ते जुन पर्यंत सरासरी तीन दिवसाआड पाणी पुरवठा करावा लागतो. नागावसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत पाणीपुरवठा योजना मंजूर आहे. या योजनेव्दारे नागावमध्ये अदयापी कोणत्याही प्रकारचे काम झालेले नाही. शिवाय मंजूर योजना नागावसाठी पुरेशीसुध्दा नाही. नागाव ग्रामपंचायत हद्दीत एकूण चार तलाव आहेत, त्यामध्ये नैसर्गिक पाणी असून त्यातील पाणी शुध्द करून वापरण्यास मिळाले तर नागाव गावाचा पाणी प्रश्न कायमस्वरूपी सुटू शकेल. त्यासाठी जलशुध्दीकरण प्रकल्पास मंजूरी मिळावी, असे निवेदनपत्र नागाव ग्रा.प.सरपंच हर्षदा मयेकर यांनी पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील यांना दिले.



# ‘महसूल व कृषी विभागाने शासकीय योजनांची माहिती शेतकऱ्यांना द्यावी’



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात कोणताही कारखाना अगर कंपनी नाही. हा पर्यटन तालुका होण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. मात्र अनेक शेतकऱ्यांना शासकीय योजनाची माहिती नाही. त्यामुळे आमचे शेतकरी योजनांपासून वंचित आहेत. पर्यटन तालुका होण्यासाठी कृषी विभागाचे सहकार्य आवश्यक आहे. महसूल व कृषी विभागाने पुढाकार घेऊन शासकीय योजनांची शेतकऱ्यांना माहिती द्यावी.असे आमदार महेंद्र थोरवे यांनी कृषी विभागाच्यावतीने खरीप पीक नियोजन व आढावा बैठकीत प्रतिपादन केले

कृषी विभागाच्यावतीने खरीप पीक नियोजन व आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी उप विभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ, उपविभागीय कृषी अधिकारी सुनील निंबाळकर, तालुका कृषी अधिकारी राजाराम शिंदे, तहसीलदार अभय चव्हाण, नायब तहसीलदार सुधाकर राठोड, सहाय्यक निबंधक शिवाजी घुले, मंडल कृषी अधिकारी दिनेश कोळी, सुनील रसाळ, ऍड. प्रमोद सुर्वे, रवींद्र झांजे, चंद्रकांत मांडे, वैशाली ठाकरे आदी उपस्थित होते. निंबाळकर यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविकात कृषी विभागाच्या योजनांची माहिती सांगितली.

यावेळी त्यांनी प्रादेशिक कृषी केंद्राकडून शेतकरी शास्त्रज्ञ् मंच गेली पाच सहा वर्ष स्थापन केला नाही. त्यामुळे काय चालले आहे? ते शेतकरी बांधवांना समजतं नाही. या मंचाची त्वरित स्थापना करावी. गेला आठवडाभर पडत असलेल्या अवकाळी पावसामुळे दुबार भातशेती पीकविणाऱ्या शेतकऱ्यांचे खूप नुकसान झाले आहे. त्यामुळे महसूल व कृषी विभागाने त्वरित पंचनामे करून अहवाल पाठवावा, अशी महत्वपूर्ण सूचना आमदार महेंद्र थोरवे यांनी केली.

यांप्रसंगी रत्नागिरी – ८ या नवीन भाताच्या वाणाचे वाटप प्रगतशील शेतकऱ्यांना करण्यात आले. कृषी पत्रिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यांप्रसंगी शशिकांत मोहिते, चंद्रकांत मांडे, दशरथ मुने, सुनील रसाळ आदी शेतकऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना शासकीय योजना राबविण्याच्या पद्धतीबद्दल नाराजी व्यक्त केली. प्रांताधिकारी प्रकाश संकपाळ यांनी, ’ शेती व्यवसाय हे सर्वात मोठे आव्हान आहे. शेती करावी की करू नये अशा संभ्रमात शेतकरी बांधव आहेत. गोपीनाथ मुंढे शेतकरी अपघात विमा ही योजना राबवताना शासकीय यंत्रणे बरोबरच त्या त्या भागातील सामाजिक कार्यकर्त्यांच्या सहकार्याची गरज आहे. अन्य योजनांचा लाभ सुद्धा शेतकऱ्यांनी घेतला पाहिजे.’ असे सूचित केले. सूत्रसंचालन कृषी पर्यवेक्षक सचिन केणे यांनी केले.

यांप्रसंगी कृषी अधिकारी हेमांगी सपकाळ, कृषी पर्यवेक्षक मंगेश गलांडे, शशिकांत गोसावी, किरण गंगावणे, अर्चना गायकवाड यांच्या सह प्रगतशील शेतकरी अजित पाटील, सूर्याजी कडव, निखिलेश दळवी, विलास लोभी, नरेंद्र गंद्रे, श्रीधर गांगल, काळुराम निरगुडा, विनय वेखंडे, अशोक पाटील, शिल्पा लोभी, स्वीटी बार्शी, माधवी गंद्रे, अर्जुन झुगरे, विनायक गोगटे, बजरंग श्रीखंडे, नरेंद्र दरेकर, महेश साळवी, मुकुंद राणे, वामन हिंदोला, भरत राणे, वनिता कोलंबे, दिलीप दाभाडे, अमोल देशमुख, नितीन देशमुख, अंकुश शेलार, कांचन जाधव, रविंद्र भोईर रामदास तुपे, करमरकर, हेमंत कोंडीलकर, बार्डी, निलेश पाटील आदींसह शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माणगाव ग्रामीण पतसंस्थेच्या इंदापूर शाखेचे उद्घाटन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या,उतेखोल ता.माणगाव या नामांकित पतसंस्थेच्या इंदापूर शाखेचा उदघाटन समारंभ गुरुवार दि.१५ मे रोजी इंदापूर येथील प्रतिष्ठित व्यापारी विलास जैन यांच्याहस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.

या शाखेच्या शुभारंभनिमित्त कार्यालयात श्री सत्यनारायणाची महापूजा सकाळी ११ ते सायंकाळी ५ यावेळेत आयोजित करण्यात आली होती.

या उदघाटनपर कार्यक्रमास उपस्थित सर्वांचे संस्थेतर्फे संस्थापक अँड.राजीव साबळे, चेअरमन आनंद यादव, व्हा.चेअरमन मदनलाल जैन, संचालक नरेश राजपूत, नंदलाल दोशी, उदय म्हशेळकर, शांतीलाल जैन,दिलीप जाधव, दिलीप अंबुर्ले, अरुण प्रभाळे, संदीप खरंगटे, संचालिका किर्ती पुराणिक, दिप्ती मोरे यांच्यासह व्यवस्थापक, कर्मचारीवृंद व स्वल्पबचत प्रतिनिधी यांनी स्वागत केले.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की. आमचे अशील यांनी मौजे केवाळे, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे – केवाळे, ता. पनवेल, जिल्हा रायगड**

| गट नं. | हिस्सा नं. | भोगवटाधारक | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| ५९ | १/क | श्री काळुराम जोमा खुटले | ०–४४–०० | १.१२ |

सदर जमीन मिळकतीपैकी श्री काळुराम जोमा खुटले यांचे मालकीची ०–१६–५० गुंठे जमिन

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, इजमेंट, वारसाहक्क वगैरे इतर कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदुतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणा–या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**ता. १५/०५/२०२५**
**पनवेल**

**सही /–**
**ॲड. वाय.एस. भोपी**
१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स, ता. पनवेल,
जि. रायगड. मोबाईल : ९८२०२७३६९१

### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **भास्कर सोमा पाटील** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

मिळकतीचे वर्णन : मौजे : आवरे (५५३३४९)
(PU-ID : 21868384909), तालुका–उरण, जिल्हा–रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २०७/२६ खाते क्रमांक : ३४७ | १ | ०.०२.०० पो.ख. ०.००.०० **एकुण ०.०२.००** | ०.०६ |

**एकुण क्षेत्र ०.०२.०० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसांचे** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती नसल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**दिनांक : १६/०५/२०२५**

**सही/–**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
बी–१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक – ३३/३४,
सेक्टर २२, कामोठे, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड –४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१

### महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जव्य विभाग पनवेल
**ई–निविदा सुचना क्र. ०१ सन २०२५–२६ (दुबार मागणी)**

देखभाल व दुरूस्ती जे.एन.पी.टी. पाणी पुरवठा योजना (पूर्णठेव), ता.उरण, जि.रायगड अंतर्गत शेवा पंपहाऊसच्या येथील पंप नं. १ चे Mix Polymer Morter वापरून मजबूतीकरण करणे या कामाच्या निविदा मजीप्राकडून मागविण्यात येत आहेत. कामाची अंदाजित किंमत रू.२७,१२,५८२/– आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि.१९/०५/२०२५ पासून www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

निविदा प्रक्रिया कार्यक्रमाच्या सर्व तारखा www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सुचनेनुसार राहतील.

दिनांक :– १३/०५/२०२५

**सही/–**
**(एस.पी. वेंगुर्लेकर) कार्यकारी**
**अभियंता म.जी.प्रा.ज.व्य. विभाग**
**नवीन पनवेल**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस ह्या जाहीर नोटीसीने कळवण्यांत येते की, खाली नमुद केलेली शेत जमीन मिळकत ही खाली लिहीलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असून, ती त्यांचे खुद्द, ताबा, कबजा, मालकी, वहीवाटीतील आहे, त्या शेत जमीन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे:–

**गांव : उचेल, तालुकाः रोहा, जिल्हाः रायगड येथील**
**खालील वर्णनाची शेत जमीन मिळकतः –**

| मालकाचे नाव | गट/भुमापन क्र. | एकूण क्षेत्र : हे.आर. | आकार रू.पै. | भोगवटा वर्ग |
|---|---|---|---|---|
| अनुसया काशिनाथ दोडेकर व इतर–२२ | १६४/३ | वरकसः ४५–४६–०० पो.ख.: ५७–०९–३० एकूणः १०२–५५–०० | २७–४४ | भोगवटा वर्ग–२/गवतपड |

आमचे अशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे, यास्तव वरील मिळकर्तीवर अन्य कोणाचा दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिएन, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, कुळवहीवाट, ताबा, कबजा, वहीवाट, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, जप्ती, मॉर्टगेज, संपादन, रिझव्हेशन, रेक्वीझेशन अगर अन्य प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध तसेच एकत्र कुटूंब मिळकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ (एकविस) दिवसाचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रत्यक्ष भेटून मुदतीमध्ये हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तशा प्रकारच्या हरकती मुदतीत दाखल न केल्या गेल्यास सदरच्या वरील मिळकती पुर्णपणे निर्वेध असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल वरील जमीन मालकांशी खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी. हे कळावे,

**दि. १५/०५/२०२५**

**सही/–**
**ॲड. समीर चंदर बंगाली,**
**पत्ता : ऑफिसः भुमि कॉम्पलेक्स, २ रा मजला,**
**सिध्दीविनायक क्लीनीक समोर, राजु पोटे मार्ग,**
**मु.पो.ता. पेण, जि.रायगड मोबा.क्र.८१४९०२९८११**

### कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नवीन प्रशासकीय ईमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन – ४२१५०३, ता. अंबरनाथ जि.ठाणे.
ई–मेल: coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in, वेबसाइट: kbmc.gov.in.

**जा.क्र. कुबनप/कर विभाग/७२/२०२५–२०२६** **दिनांक : १४/०५/२०२५**

**निविदा सूचना**

कुळगाव बदलापूर नगरपरिषदेची सन २०२५–२६ या वर्षाची मालमत्ता कराची बिले वाटप करणे करण्यासाठी नोंदणीकृत कंत्राटदारांकडून जाहीर निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा फॉर्म फी | निविदा अनामत रक्कम | मुदत |
|---|---|---|---|---|
| १. | कुळगाव बदलापूर नगरपरिषदेची सन २०२५–२६ या वर्षाची मालमत्ता कराची बिले वाटप करणे | ५००+GST | १००००/– | ८ दिवस |

निविदा फॉर्म दिनांक १६/०५/२०२५ ते दिनांक २३/०५/२०२५ पर्यंत offline पद्धतीने द्रि–लिफाफा पद्धतीने नगरपरिषद कार्यालयात प्राप्त होतील. निविदा फॉर्म फी व निविदा अनामत की ऑफलाईन भरणेचे आहे.


वरिल प्रक्रियेद्वारे प्राप्त झालेल्या निविदा दिनांक २७/०५/२०२५ रोजी दुपारी ४.०० वा. किंवा अन्य सोयीच्या दिवशी निश्चित होईल त्या दिवशी दालनात उपस्थित संस्थाचे प्रतिनिधी/ कंत्राटदार अथवा अधिकृत प्रतिनिधी समोर उघडण्यात येतील. कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी, कुळगांव–बदलापूर नगरपरिषद यांनी राखून ठेवलेला आहे.

**सही/–**
**मुख्याधिकारी**
**कुळगाव बदलापूर नगरपरिषद**


# उत्कर्षा पवार यांचे ३५व्या वर्षी शालांत परीक्षेत यश

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील पिटसई कोंड गावच्या. उत्कर्षा हरेश पवार यांनी ३५व्या वर्षी चिकाटी,जिद्द व मेहनतीने शालांत परीक्षेत ५६%गुण मिळवून यश संपादन केले आहे. आजच्या विद्यार्थ्यांना त्यांचा आदर्श घेण्यासारखे आहे.त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे पुर्ण तालुक्यातून कौतुक होत आहे.



उत्कर्षा ह्या गृहिणी असून त्यांच्या पतीची व सासरयांची ईच्छा होती कि हिने दहावीपर्यंत शिक्षण घ्यावे. १३ वर्षापूर्वी लग्न झाले. त्यावेळी त्यांचे शिक्षण सातवी पर्यंत झाले होते. त्यांना आणखी शिक्षण घ्यायचे होते.तळ्यात शिकण्याची सुविधा होती. परंतू माहेरी मालूक येथे सातवी नंतरच्या शिक्षणाची सुविधा नव्हती.

त्यामुळे त्यांनी पुढील शिक्षणाला तेथेच पूर्णविराम दिला. परंतु मुलांच्या शिक्षणात त्यांना काही मदत करता येत नाही याचे त्यांना वाईट वाटत होते.म्हणून त्यांनी आपले पती हरेश पवार व सासरे जनार्दन पवार यांची ईच्छा आहे तर आपण परीक्षा द्यायची हे ठरविले.व मेहनत करून त्यांनी परीक्षेत यश संपादन केले आहे.

त्या म्हणतात की,शिक्षणाला वयाची काहीच अडचण येत नाही मेहनत, चिकाटी , जिद्द व घरच्यांचे पाठबळ असेल तर मनुष्य कुठल्याही वयात शिक्षण घेऊन यश संपादन करू शकतो.पण माझे सासरे हे यश पहायला या जगात नाही आहेत याचे मला खुप वाईट वाटत आहे.

# संदीप पाटील यांचा सामाजिक कार्यात नेहमीच पुढाकार -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संदीप पाटील सातत्याने सामाजिक उपक्रम राबवत असतात त्यामुळे ते वयाच्या पन्नाशीनंतरही आणखी जोमाने आणि उमेदीने कार्यरत राहतील, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी नवीन पनवेल येथे केले. ते माजी नगराध्यक्ष आणि भाजपचे शहर उपाध्यक्ष संदीप पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित महिलांसाठी कबड्डी स्पर्धेवेळी बोलत होते.

या वेळी भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगरसेवक गणेश कडू, नवीन पनवेल मंडल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, माजी उपमहापौर चारूशीला घरत, माजी नगरसेविका सुशीला घरत, वर्षा नाईक, भीमराव पोवार, विजय म्हात्रे, माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेखा पाटील, रवी नाईक, सूर्यकांत ठाकूर आदी उपस्थित होते.



आमदार प्रशांत ठाकूर पुढे म्हणाले की, संदीप पाटील यांना खेळाची आवड आहे म्हणून त्यांचा फिटनेस चांगला आहे. खेळांना ते प्रोत्साहन देत असतात.सामाजिक कार्यात अग्रेसर राहून नागरिकांना सुविधा देणे, विविध योजना राबविणे हे त्यांचे काम सुरू असते. भविष्यात त्यांना आणखी जोमाने काम करायचे आहे आणि मोठे सामाजिक कार्य त्यांच्या हातून घडावे अशी शुभेच्छा दिल्या.

तर माजी नगराध्यक्ष संदीप पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकात, ओम साई कलावंत मंडळाने माझ्या अनुपस्थितीत ही जिल्हास्तरीय कबड्डीची लिग स्पर्धा आयोजित केली. नागरिकांनी मला सामाजिक कार्याची संधी दिली त्यामुळे मी इथपर्यंत पोहोचलो..भाजपा आणि आमचे मार्गदर्शक आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून आणखी उत्तरोत्तर प्रगती करता येईल, नागरिकांची कामे करता येतील असेही पाटील म्हणाले.

ही जिल्हास्तरीय लिग स्पर्धा यशस्वी करण्यासाठी ओम साई कलावंत मंडळाने नितीन चोरघे, मयुर कदम, अभिजित दिवेकर, सुयोग पाटील, प्रमोद म्हामुणकर, मंगेश घरत आदींनी प्रयत्न केले. तर या स्पर्धेत वृतिक्षा स्पोर्ट्स क्लब पेण, कर्नाळा स्पोर्ट्स अकादमी पनवेल, दिलखुश क्रीडा मंडळ अलिबाग, श्री सुवर्ण गणेश दिवे आगार या संघांनी सहभाग घेतला.

## फ्लॅटचा ताबा न देता फसवणूक; गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

फ्लॅटचा ताबा न देता दिलेली रक्कम परत न केल्याने पंकज शंकरलाल भानुशाली (ऐरोली), दिनेश शंकरलाल भानुषाली आणि मुकेश दिनेश भानुशाली यांच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

अमरजीत मेकअप हे नेरूळ येथे राहत असून त्यांनी व त्यांच्या मित्रांनी २०१३ मध्ये फ्लॅटमध्ये गुंतवणूक करण्याचे ठरवले. त्यांनी पनवेल तालुक्यातील पिसार्वे येथील मेसर्स मारवल लाईफ स्पेसेस फार्म यांच्या साई शांती पार्क या प्रोजेक्टमध्ये पैसे गुंतवण्याचे ठरवले. या फॉर्मचे मालक पंकज भानुषाली, दिनेश भानुषाली, मुकेश भानुषाली होते. त्यानुसार त्यांनी साडेतीन लाख रुपये दिले. यावेळी २०१९ पर्यंत फ्लॅटचा ताबा देण्यात येईल असे सांगितले. त्यानंतर पुन्हा सात लाख ३५ हजार रुपये चेकने देण्यात आले.

२०१५ मध्ये प्रोजेक्टचे काम सुरू झाले मात्र २०१७ मध्ये ते थांबवण्यात आले होते. यावेळी भानुशाली यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी वारंवार आश्वासन दिले. २०१३ पासून दिलेले दहा लाख ८५ हजार रुपये परत केले नाहीत आणि फ्लॅटचा ताबाही दिला नाही. त्यामुळे तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.



**पनवेल : उलवे सेक्टर २० येथील मंदिरात छत्रपती संभाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाला स्थानिक नागरिक, युवकवर्ग, महिला मंडळी आणि मंडळाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य आणि बलिदानाचे महत्त्व जाणून घेत अभिवादन केले.**

## डिझेलची चोरी

**पनवेल :** कारमधून आलेल्या चार अनोळखी गाडीतील डिझेलची चोरी केली आणि दोन मोबाईल चोरून नेले. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात चार अनोळखी ईसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. कमलेश मीना हे राजस्थान येथील असून ते टाटा ट्रकवर चालक म्हणून काम करतात. राजस्थान येथून श्री साई मार्बल शिव मंदिराजवळ, खुटारी गाव (तळोजा) येथे मार्बल भरून खाली करण्यासाठी पोहचले. या वेळी लाल रंगाच्या ब्रिजा कारमधून चार अनोळखी उतरले आणि त्यांनी ट्रकमधून डिझेलची चोरी केली. त्यानंतर ट्रकमध्ये ठेवलेल्या दोन मोबाईलची चोरी करून ते घेऊन गेले.

## कळंबोलीत रंगणार भव्य अंडरआर्म बॉक्स क्रिकेट स्पर्धा

■ १७ व १८ मे रोजी थरारक सामने

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टी व युवा मोर्चा कळंबोली यांच्या संयुक्त विद्यमाने माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवार १७ मे व रविवार १८ मे रोजी कळंबोलीत भव्य अंडरआर्म बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा रोडपाली येथील नवीन बस डेपो जवळील मैदानावर दिवस-रात्र रंगणार असून स्थानिक क्रिकेट प्रेमींसाठी ती पर्वणी ठरणार आहे. तसेच विविध संघांमध्ये चुरस पाहायला मिळणार असून स्पर्धेचे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

स्पर्धेसाठी आकर्षक बक्षिसांची घोषणा करण्यात आली आहे, त्यामध्ये स्पर्धेतील प्रथम पारितोषिक २१ हजार १११ रुपये व भव्य चषक, द्वितीय क्रमांकाला ११ हजार १११ तर तृतीय व चतुर्थ क्रमांकाला प्रत्येकी ५ हजार ५५५ रुपये व चषक देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या स्पर्धेमुळे परिसरातील युवकांना खेळातील कौशल्य दाखवण्याची उत्तम संधी उपलब्ध होणार आहे.



**पनवेल : भाजपचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, अनुसुचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, भाजप नेरे मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.**

## चिरनेरमध्ये संभाजी महाराजांचा जयजयकार!

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या चिरनेर कातळपाडा गावात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांची जयंती येथील छावा प्रतिष्ठानच्या वतीने साजरी करण्यात आली.

छावा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सुभाष कडू यांच्या कल्पकतेतून साजऱ्या करण्यात आलेल्या धर्मवीर शंभूराजांच्या जयंतीच्या सोहळ्याने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले होते. आरंभी छत्रपती शंभुराजांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन, जन्मोत्सव व पाळणा गीत सादर करण्यात आले. त्यानंतर श्री सत्यनारायणाची महापूजा आणि सायंकाळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी छावा प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी सदस्य व ग्रामस्थ राजकीय नेतेमंडळी मित्रपरिवार तसेच हितचिंतक या सर्वांनी विशेष परिश्रम घेतले.




## निवडक

### पळस्पे येथून तरुणी बेपत्ता



**पनवेल :** राहत्या घरातून एक तरुणी कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. निकिता रामदास कातकरी (२१ रा.पळस्पे गाव) असे या तरुणीचे नाव असून बांधा मजबूत, चेहरा गोल, डोळे काळे, नाक बसके, उंची चार फुट असून अंगात चॉकलेटी रंगाचा टॉप व पांढरी लेगिझ परिधान केलेली आहे. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस नाईक चव्हाण (८४२४०३२१११) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### अक्षरा मौर्याचे दहावीत यश



**पनवेल :** उलवे येथील रेडक्लिफ स्कूलची इयत्ता दहावीची विद्यार्थिनी अक्षरा मौर्या हिने आपल्या परीक्षेमध्ये ८८ टक्के गुण मिळवून शाळेचे आणि कुटुंबाचे नाव उज्वल केले आहे. तिच्या या यशाबद्दल मां भारती वेलफेअर फाउंडेशनतर्फे अभिनंदन करण्यात आले असून, तिच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

### निर्मल अकॅडमीचे घवघवीत यश

**कळंबोली :** निर्मल अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करीत, उत्कृष्ठ निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. या अकॅडमीमधील सेंट जोसेफ शाळेची विद्यार्थिनी कुमारी अर्पणा विठ्ठल भानुसे ही ९६.६० टक्के गुण मिळवून पहिली आली. या अकॅडमीच्या १९ विद्यार्थीना ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळाले मिळाले आहेत. तर १८ विद्यार्थांनी ८५ ते ९० टक्के गुण मिळविले आहेत.

### 'युईएस'चा १०० टक्के निकाल

**उरण :** युईएस इंग्लिश मिडियम स्कूलचा १०० टक्के निकाल लागला असून, ठाकूर ग्रीष्मा रुपेश हिने ९५.६० टक्के मिळवून पहिला क्रमांक मिळविला, शिसवे भक्ती शंकर हिने ९४.८० टक्के मिळवून दुसरा क्रमांक मिळविला. तर पाटील पृथा अमित आणि कुमार साळुंखे अर्थव निलेश या दोघांनी ९४.६० टक्के मिळवून तिसरा क्रमांक मिळविला. तसेच म्हात्रे दक्ष जगदिश याने ९४.४० टक्के मिळवून चौथा क्रमांक व कुमारी जाधव भार्गवी मंदार ९४.२० टक्के मिळवून पाचवा क्रमांक मिळविला.

### फुंडे हायस्कूलचा निकाल ९२.५२%

**उरण :** रयत शिक्षण संस्थेचे तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे हे उरण तालुक्यातील एक नावाजलेल हायस्कूल आहे. दरवर्षीप्रमाणे आपल्या उज्वल निकालाची परंपरा कायम ठेवत शैक्षणिक वर्ष २०२४-२५मध्ये दहावीचा निकाल ९२.५२% लागला आहे. यामध्ये कोळी श्रावणी जयदास ९५ टक्के गुण मिळून प्रथम क्रमांकाने तर कुमारी चव्हाण वैष्णवी अंकुश ८९.८०% गुण मिळून द्वितीय आणि कुमारी म्हात्रे वीरश्री महेश ८६.८०% गुण मिळून विद्यालयात तृतीय आलेली आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन होत आहे.

### 'विद्याभवन'ची निकालात परंपरा

**नवी मुंबई :** दहावीत नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलाने यंदाही १००% निकालाची बावीस वर्षांची परंपरा कायम ठेवली. इंग्रजी माध्यमातून रवितनया दादसो चव्हाण हिने ९७.८० % प्रथम,अनघा अभय शेळके आणि त्रिशा कमलेश गुप्ता अनुक्रमे ९६.६०% आणि ९५.००% गुण मिळवत द्वितीय आणि तृतीय आल्या. मराठी माध्यमातून त्रिशा सतीश साबळे ९३.८० % प्रथम, प्रियदर्शनी दिलीप कोरडे आणि अक्षदा पाटीलबुवा दगाबाज अनुक्रमे ९३.६० % आणि ९३.४०% गुण मिळवत द्वितीय आणि तृतीय आल्या.

### नवी मुंबई मनपा शाळांचे यश

**नवी मुंबई :** दहावी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून नवी मुंबई महानगरपालिका माध्यमिक शाळांचा निकाल ९४.७२ टक्के एवढा लागलेला आहे. यामध्ये नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्रमांक १०४ राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर, रबाळे येथील अंशिका अंगद यादव ही विद्यार्थिनी ९५ टक्के गुण संपादन करून महानगरपालिकेच्या २३ माध्यमिक शाळांमध्ये सर्वाधिक गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी तिचे व सर्वच गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

### लोकशाही दिनाचे आवाहन

**पनवेल :** महापालिकेमार्फत आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली प्रत्येक महिन्याचा पहिला सोमवार किंवा या दिवशी सुट्टी असल्यास, त्यानंतर येणारा कामकाजाच्या दिवशी लोकशाही दिन आयोजित करण्यात येत आहे. त्यानूसार पुढील महिन्यातील २ जून रोजी महापालिका मुख्यालयात लोकशाही दिन साजरा करण्यात येणार आहे. लोकशाही दिनामध्ये सहभाग घेण्यासाठी नागरिकांनी अर्ज विहित नमुन्यात १५ दिवस आधी २ प्रतीत पाठविणे आवश्यक राहील. तसेच तक्रार,निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे असावे, असे आवाहन मनपातर्फे करण्यात आले आहे.

क्लिक...क्लिक...!



(छाया : बी. एस. कुलकर्णी)

**रसायनी : आपटा गाव परिसरात बुधवारी अवकाळी पाऊस पडला. त्यामुळे हवेत काही काळ गारवा पसरला होता.**

## निवडक

### पालकर शाळेचे दहावीत यश

**चौक :** सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर, चौक या माध्यमिक शाळेचा ९४.२७ टक्के निकाल लागल्याने विद्यार्थी आणि शिक्षक यांचे अभिनंदन होत आहे. परीक्षेस प्रविष्ठ झालेले विद्यार्थी १९२ होते, त्यापैकी १८१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून एकूण शेकडा निकाल ९४.२७ टक्के लागला आहे. मुजावर निज्बा हाजिमलंग ८७.६० टक्के, ठोंबरे आर्या उज्वल ८६.८० टक्के, पाटील रिया मोहन ८५.४० टक्के, आडावकर वेदिका योगेश ८५.४० टक्के, घरत स्वरूपा उत्तम ८४.२० टक्के, फराट श्रेयश कुमार ८४ टक्के, परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन मुख्याध्यापक, तसेच संस्था चालक यांनी केले.

### एमडीएन स्कूलचा १०० टक्के निकाल

**रोहे :** एमडीएन इंटरनॅशनल स्कूलचा (CBSE) इयत्ता दहावीचा निकाल जाहीर झाला असून, यंदाचा निकाल अत्यंत समाधानकारक आणि गौरवास्पद ठरला आहे. शाळेचा निकाल १०० टक्के लागला आहे. या वर्षी प्रेक्षा यादव हिने ८७.१७ टक्के गुणांसह शाळेत सर्वोच्च क्रमांक पटकावला. तिच्या खालोखाल दुसऱ्या क्रमांकावर प्रणव अंबरुस्कर याने ८६.३३ टक्के गुण मिळवले. तिसऱ्या क्रमांकावर श्रेयश महाडिक याने ८५ टक्के, गुण मिळवत शाळेच्या यशात भर घातली.

### ‘अंजुमन’चा निकाल ९७.७७ टक्के

**मुरूड :** शहरातील उर्दू माध्यम असणारी सुपरिचित हायस्कूल अंजुमन इस्लाम जंजिरा हायस्कूलचा दहावीमधील निकाल ९७.७७ टक्के लागला आहे. या हायस्कूलमधून दाते सारा इब्राहिम हिने ९३.४० टक्के गुण मिळवून प्रथम, भालदार अरबिना एजाझ ८९.४० टक्के गुण मिळवून द्वितीय, शेखानी आमना अब्दुल रहमान या विद्यार्थिनीने ८८.४० टक्के गुण मिळवून तिसरा, कादरी सोबिया वसिम ८४.२० टक्के गुण मिळवून चौथा तर कडू मदिहा इरफान ८३.२०% गुण मिळवून पाचवा क्रमांक मिळवला आहे.

### युनायटेड इंग्लिश स्कूलचे यश

**माणगाव :** तालुक्यातील युनायटेड एज्युकेशन अँड वेल्फेअर ट्रस्ट संचालित युनायटेड इंग्लिश स्कुल मोर्बा शाळेने पहिल्याच वर्षी दहावी परीक्षेत नेत्रदीपक यश संपादन करताना या शाळेचा दहावी परीक्षेचा एकूण निकाल १०० टक्के इतका लागला असून,महेरोज म. हनीफ जाफर या विद्यार्थिनीने ९३ टक्के इतके गुण संपादन करून शाळेमध्ये सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे. या शाळेमधून अनस अखलाक धनसे ९१.२० टक्के गुण संपादन करून द्वितीय क्रमांक तर सफा अ.हादी टाके ९०.४० टक्के गुण संपादन करून तृतीय आली आहे.

### वाघरे स्कूलचा निकाल १०० टक्के

**माणगाव :** तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या गणेश यशवंत वाघरे इंग्लिश मिडीयम स्कुलने आपली उज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. या शाळेचा दहावी परीक्षेचा एकूण निकाल १०० टक्के इतका लागला असून रिचा विजय येलवे या विद्यार्थिनीने ९४.४० टक्के इतके गुण संपादन करून शाळेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान पटकावला आहे. या शाळेतून शांभवी बालाजी शिर्के ९२.४० टक्के गुण संपादन करून द्वितीय, रिया अमित राजपूरकर ८९.४० टक्के गुण संपादन करीत तृतीय आली आहे.

### नागोठण्यातील शाळांचे दहावीत यश

**नागोठणे :** माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा २०२५ मध्ये नागोठणे येथील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या एस. डी. परमार इंग्लिश मेडीयम स्कुल व जु. कॉलेजचा निकाल १०० टक्के, नागोठण्यातील नीव सोशियल अँड एज्युकेशन ट्रस्टच्या होली एंजल स्कुल या इंग्लिश माध्यमाच्या शाळेचा निकाल १०० टक्के व नागोठणे एज्युकेशन सोसायटीच्या उर्दू हायस्कूलचा निकाल १०० टक्के तसेच कोएसो श्रीमती गु. रा. अग्रवाल विद्यामंदिरचा निकाल ९५.७७ टक्के लागला आहे.

### ‘जिंदल’चा निकाल प्रेरणादायी

**मुरूड :** तालुक्यातील जिंदल विद्यामंदिर, साळाव या प्रतिष्ठित शाळेने सीबीएससी दहावी आणि बारावीच्या २०२४ च्या निकालात दैदिप्यमान यश संपादन करत शिक्षण क्षेत्रात नवा आदर्श निर्माण केला आहे. यावर्षी विद्यार्थ्यांनी दाखवलेली मेहनत, चिकाटी आणि सातत्य शाळेच्या उज्वल परंपरेची साक्ष कायम राखली आहे. इयत्ता दहावी मध्ये या वर्षी ७३ विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली असून सर्वजण उत्तीर्ण झाले व शाळेने १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली. प्रथम वर्धन बुरसे ९८.६ टक्के, द्वितीय अक्षरा जगे व साईराज शिंदे ९६.८ टक्के, तृतीय निशा जैन ९५.६ टक्के हिला प्राप्त झाले.

# मोकाट गुरांचे आरोग्य धोक्यात!

## वाढता उष्मा व चाऱ्याच्या अभावामुळे फरपट; उकिरड्याचा आधार

**पाली : प्रतिनिधी**

उन्हाचा तडाखा सर्वत्रच वाढला आहे. अशातच जनावरांसाठी हिरव्या व सुक्या चाऱ्याचादेखील अभाव निर्माण झाला आहे. त्यामुळे मोकाट जनावरांना खाण्यासाठी अन्न पाण्याची कमतरता भासू लागली आहे. मग हि मोकाट गुरे पालीत डम्पिंग ग्राउंड व उकिरड्यावर जावुन मिळेल ते खात आहेत. त्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शिवाय स्वच्छतेचा प्रश्नदेखील ऐरणीवर आला आहे.



येथील डम्पिंग ग्राऊंडवर तसेच जुने पोलीस स्थानक, मधली आळी, बल्लाळेश्वर मंदिर, बल्लाळेश्वर नगर व मराठी शाळा आदी ठिकाणी उकिरड्यावर सकाळ पासूनच मुकाट गुरांची गर्दी असते. येथे टाकलेला कचरा ही गुरे अस्ताव्यस्त करतात त्यामुळे येथे घाण व दुर्गंधी पसरते. त्यामुळे नागरिकांचे आरोग्यदेखील धोक्यात येते. बऱ्याचवेळा टाकुन दिलेले अन्न पदार्थ पिशव्यांमध्ये असते. परिणामी गुरांच्या पोटात कमी अधिक प्रमाणात प्लास्टिक जाते. प्लास्टिक व सडके आणि कुजलेले अन्न पदार्थ खाऊन या जनावरांच्या आरोग्यावर घातक परिणाम होतात. त्यांची पचनशक्ती मंदावते, अन्नाच्या शोधात सतत चालल्याने त्यांची ऊर्जा कमी होते. अशक्तपणा येतो.

डम्पिंग ग्राउंड व उकिरड्यावरील कचऱ्यात धातू तसेच अनुकुचिदार वस्तू उदा. घरगुती वापराच्या वस्तू, काचेच्या वस्तू व इंजेक्शनच्या सुया आदी घटक असतात. त्या पोटात गेल्यामुळे जनावरांच्या जठराला व अन्ननलिकेला इजा पोहचते. सतत प्लास्टिक खाल्ल्यामुळे ते त्यांच्या पोटात साठते त्यामूळे गुरे मरतातदेखील. काही वेळेस अशा मेलेल्या गुरांची हाडे इतर गुरे आणि प्राणी चघळतात व पर्यायाने त्यामुळे त्यांचा देखिल मृत्यू होतो. आणि हे दुष्टचक्र सुरूच राहते.

### *चारा-पाण्याची व्यवस्था करावी*

*उष्म्याने जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे शेतकरी किंवा गुरेपालक यांनी आपली गुरे चरण्यासाठी मोकाट सोडू नयेत. शासनाने मोकाट गुरांच्या चारा पाण्याची व्यवस्था केली पाहिजे. किंवा पशुपालकांना यासाठी अनुदान दिले पाहिजे. नागरिकांनी रस्त्याच्या कडेला कचरा न टाकता घंटागाडीतच कचरा टाकावा. जेणेकरून गुरे तेथे येणार नाहीत.*

### *जनावरे मोकाट सोडू नये*

*शेतकऱ्यांनी व पशुपालकांनी आपली जनावरे मोकाट सोडू नये. त्यांना पेंढा किंवा सुके गवत खाऊ घालावे. कचऱ्यात किंवा उकिरड्यावर टाकलेले अन्न पदार्थ खाऊन गुरांची पचनक्रिया बिघडते. मानवी खाद्य हे जनावरांसाठी नाही. वारंवार प्लास्टिक पोटात गेल्याने ते पोटात साठून गुरांचा मृत्यू देखील होऊ शकतो. शहरी तसेच ग्रामीण भागात निसर्गपूरक जिवन अंगिकारणे गरजेचे आहे.*

## खंडित वीजपुरवठ्याने नागरिक त्रस्त

**अलिबाग : प्रतिनिधी**

वाढलेले तापमान, लग्नसराई, पर्यटनाचा हंगाम यामुळे वीजेची मागणी वाढली आहे. अशा परिस्थितीत रायगड जिल्ह्यात सतत वीजपुरवठा खंडित होत आहे. शहरी भागांच्या तुलनेत ग्रामीण भागात वीजपुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण अधिक आहे. वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने रायगडकर त्रस्त झाले आहेत.

जिल्ह्यात तापमानाचा पारा चाळीस अंशावर पोहोचला आहे. अंग घामाच्या धारांनी भिजून निघत आहे. त्यामुळे वीजेची मागणी वाढली आहे, मात्र गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यातील बहुतांश तालुक्यात वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण अचानक वाढले आहे. दिवसा आणि रात्री अपरात्री वीज पुरवठा खंडीत होत असल्याने नागरिक बेजार झाले आहेत. कर्जत, रोहा, कोलाड, माणगाव, गोरेगाव या परिसरात वीज पुरवठा वारंवार खंडीत होत आहे. इतर तालुक्यांमधील वीजेचा लपंडाव सुरू असल्याच्या तक्रारी येत आहेत. अशातच आता महावितरणकडून मॉन्सुन पूर्व कामे हाती घेण्यात आली आहे. वीज वाहिन्यांची दुरुस्ती, रोहित्रांची देखभाल, वीज वाहिन्या लगतची वृक्ष छाटणी अशी कामे सध्या सुरु आहेत. ही कामे करण्यासाठी तासंतास वीजपुरवठा खंडीत केला जात आहे.

लग्नसराईचा हंगाम सध्या सुरू आहे. सतत खंडीत होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे यजमानांची मोठी अडचण होत आहे. दुसरीकडे अलिबाग, मुरूड आणि श्रीवर्धन तालुक्यात पर्यटन हंगाम जोरात आहे. राज्यभरातून हजारो पर्यटक कोकणात दाखल होत आहेत, मात्र खंडीत वीज पुरवठ्याचा फटका त्यांनाही सोसावा लागत आहे. सतत खंडीत होणाऱ्या वीज पुरवठ्याने हॉटेल व्यवसायिकही हैराण झाले आहेत.

## मेहंदळे हायस्कूलचा एससीसी निकाल ९८.४६%

**नागोठणे : बातमीदार**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी- मार्च मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १० वीचा निकाल ऑनलाईन पद्धतीने १३ मे रोजी जाहीर करण्यात आला.

कोकण एज्युकेशन सोसायटीचे मेहेंदळे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाने आपल्या उज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. यावर्षी इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेसाठी विद्यालयातून एकूण १९५ परीक्षार्थी बसले होते. यापैकी १९२विद्यार्थी पात्र होत विद्यालयाचा निकाल हा ९८.४६ टक्के इतका लागला आहे. त्यामुळे यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे.

यावर्षी मनस्वी राजेश मांजरेकर या विद्यार्थिनीने ९६.२०% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावत मुलांमधून प्रथम क्रमांक मिळविण्याचा रेकॉर्ड मोडीत काढला आहे. तर सिमरन राजेश जाधव या विद्यार्थिनींनी ९३.४० टक्के गुण मिळवत द्वितीय आणिहर्षल अशोक ठोसर या विद्यार्थ्याने ९०.४० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला आहे. त्याचप्रमाणे अवधूत केतन भोसले या विद्यार्थ्याला ९०.२० टक्के आणि निहार गोविंद डाळे या विद्यार्थ्याने देखील ८९.०० टक्के गुण मिळवून यश संपादन केले आहे.

दरम्यान, या यशस्वी विद्यार्थ्यांच्या मागे विद्यालयाचे प्राचार्य रमेश मोसे यांचे यशस्वी नियोजन व व्यवस्थापन असल्याचे पालक वर्गाकडून बोलले जात असून पालकांकडून त्यांचे व सर्व विषय शिक्षक व इतर शिक्षक यांचे अभिनंदन करून आभार व्यक्त करण्यात आले. तसेच मेहेंदळे हायस्कूलचे बहुसंख्य विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्याबद्दल कोएसोचे सर्व पदाधिकारी,संचालक मंडळ त्याचप्रमाणे चेअरमन संदीप गांगल यांनी समाधान व्यक्त केले. विद्यालयातील शिक्षक त्याचप्रमाणे पालक यांच्याकडून यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन करत पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त खोपोलीत पालखी



**खोपोली : प्रतिनिधी**

राजे छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त खोपोलीत वेध सह्याद्री व शिवप्रेमीच्या माध्यमातून भव्य पालखी सोहळा आयोजित करण्यात आला होता.

येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याला अभिवादन करून हा पालखी सोहळा प्रारंभ झाला. या वेळी माजी नगराध्यक्ष डॉ.सुनील पाटील यांनी पालखीला खांदा लावून प्रारंभ केला. पुढी शहरातील सर्व रहिवासी भागातून ही पालखी आगमन होऊन प्रत्येक ठिकाणी नागरिकांनी पालखीचे भव्य स्वागत केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याला अभिवादन करून हा पालखी सोहळा करण्यात आला.

या वेळी वेद सह्याद्री खोपोलीचे सर्व पदाधिकारी, मोठ्या प्रमाणावर शिवप्रेमी उपस्थित होते. मोठ्या उत्साहात व दिमाखात हा सोहळा साजरा करण्यात आला.

### पै. अन्वर बुराण स्मृतीचषक क्रिकेट स्पर्धा

## बी.पी. पाटील क्रिकेट अकॅडमी चॅम्पियन

**अलिबाग : प्रतिनिधी**

झुंझार युवक मंडळ पोयनाड आयोजित व रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने पै.अन्वर बुराण स्मृतीचषक चौदा वर्षाखालील मुलांच्या एकदिवसीय ४० षटकांच्या लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत बी.पी पाटील क्रिकेट अकॅडमी खारघर संघानी अंतिम सामन्यात प्रतिक क्रिकेट अकॅडमी पनवेल संघावर विजय मिळवत चॅम्पियन्स होण्याचा मान मिळवला आहे.

स्पर्धेच्या अंतिम सामन्यात नाणेफेकीचा कौल प्रतिक क्रिकेट अकॅडमी पनवेल संघाने जिंकला व प्रथम फलंदाजीसाठी बी.पी क्रिकेट अकॅडमी संघाला आमंत्रण दिले.बी.पी पाटील क्रिकेट अकॅडमी संघाने ३९.२ षटकात सर्व गडी गमावत १६२ धावा फलकावर नोंदवल्या त्यामध्ये रोहन चौरे यांनी सर्वाधिक ३३ व आदित्य यादव १८ धावा काढल्या प्रतिक क्रिकेट अकॅडमी कडून आयुष वढे व पार्थ जंगम यांनी प्रत्येकी तीन फलंदाज बाद केले.१६३ धावांना उत्तर देताना प्रतिक क्रिकेट अकॅडमी संघाने ९ गडी बाद ७१ धावा काढल्या त्यामध्ये युवराज घरत यांनी सर्वाधिक २० व अंश माळी यांनी १८ धावांचे योगदान संघाला दिले, बी.पी पाटील संघाकडून अथर्व उंडे यांनी सर्वाधिक तीन फलंदाज बाद केले तर श्रेयांक मुनी व अथर्व पवार यांनी प्रत्येकी दोन फलंदाज बाद केले. पावसामुळे सामना थांबवावा लागला त्यानंतर (नयन कट्टा रनरेट नियमानुसार) बी.पी पाटील क्रिकेट अकॅडमी खारघर संघाला विजयी घोषित करण्यात आले.

संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या आदित्य यादव याला मालिकावीर,उत्कृष्ठ गोलंदाज म्हणून श्रेयांक मुनी, उत्कृष्ठ फलंदाज व उत्कृष्ठ क्षेत्ररक्षक म्हणून आदित्य यादव तर अंतिम सामन्याचा सामनावीर म्हणून अथर्व उंडे स्टार प्रतिस्पर्धी खेळाडू म्हणून पार्थ जंगम यांना झुंझारचे सचिव किशोर तावडे, सदस्य अजय टेमकर, अ‍ॅड.पंकज पंडित, बी.पी पाटील क्रिकेट अकॅडमीचे प्रशिक्षक कुणाल पाटील, आकाश भोईर, पनवेल संघाचे प्रशिक्षक प्रतिक मोहिते यांच्या हस्ते चषक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

## बेपत्ता महिला व तरुणीचा शोध

**उरण :** उलवे येथून ४३ वर्षीय महिला २०२२ पासून तर २२ वर्षीय तरुणी २०२१ पासून बेपत्ता असल्याने या दोघींचा शोध न्हावा शेवा पोलीस घेत आहेत.

बेपत्ता महिलेचे नाव सुष्मा देविदास पोळ असे असून तिची उंची अंदाजे पाच फूट, बांधा सडपातळ, चेहरा उभट, केस काळे, डोळे काळे, नाक सरळ आहे. तर बेपत्ता तरुणीचे नाव पुजा पुरुषोत्तम गुप्ता असे असून उंची पाच फूट चार इंच, चेहरा उभट, केस काळेभोर, कपाळ रूंद, नाक सरळ आहे.

अशा वर्णनाची महिला व तरुणी कोणाला दिसल्यास त्यांनी ८६५५३५४११९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन न्हावा शेवा पोलिसांनी केले आहे.

## नांदगाव हायस्कूलचा निकाल शंभर टक्के

**मुरूड : प्रतिनिधी**

सहजीवन विद्यामंडळ संचलीत श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यामंडळ नांदगाव हायस्कूलमध्ये मुग्धा चंद्रकांत नांदगावकर या विद्यार्थिनिस ८७ टक्के गुण मिळवून या विद्यालयातून प्रथम क्रमांक मिळवला आहे. तर जानवी माळी हिला ८६.६० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळवला आहे. सिद्धी विनायक शेडगे हिला ८५.४० टक्के गुण मिळून तृतीय क्रमांक मिळवला आहे.

वेदांगी मानाजी हिला ८५.२० टक्के गुण मिळवून चतुर्थ क्रमांक आला आहे. अक्षरा मंगेश शेळके व स्वराज सुधीर वाडकर या दोघांना ८४.८० टक्के गुण मिळून पाचवा क्रमांक मिळवला आहे. नांदगाव हायस्कूलमध्ये इयत्ता दहावी साठी १२० विद्यार्थी बसले होते येथील सर्व विद्यार्थी पास होऊन या शाळेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. सेमी इंग्रजी विभागात या शाळेतील ६२ विद्यार्थी होते ६२ ही विद्यार्थी उत्कृष्ट गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन सर्व संचालक मंडळ यांनी केले.

या शाळेचे चेअरमन फैरोज घलटे यांनी सांगितले की, शाळेचा निकाल शंभर टक्के लावण्यात सर्व शिक्षक व शिक्षिका यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. सर्व मुलांनी चांगला अभ्यास केल्यामुळे या शाळेचा निकाल शंभर टक्के लागण्यात मदत झाली आहे. या वेळी चेअरमन फैरोज घलटे यांनी मुख्याध्यापक अर्चना खोत व पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर यांचे उत्कृष्ट निकाल लावल्याबद्दल पुष्पगुच्छ देऊन विशेष अभिनंदन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कारावेळी मुख्याध्यापक अर्चना खोत, पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर, शिक्षक प्रतिनिधी योगेश पाटील, सागर राऊत, महेश वाडकर, राहील घलटे, शिक्षकेत्तर प्रतिनिधी संतोष बुल्लू, मुख्य लिपीक मंगेश नांदगावकर, दीपक गोसावी व पालकवृंद उपस्थित होते.



## विद्यार्थ्यांना शालेय आणि जीवनोपयोगी वस्तूंचे वाटप

**पेण : प्रतिनिधी**

चिल्ड्रन्स फ्युचर इंडिया रायगड पेण संस्थेच्या वतीने पाच हजार मुलांना शालेय आणि जीवनोपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले तसेच सीएफआयच्या उत्कर्षनगर येथील कार्यालयात संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली वियार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. या वेळी उपस्थित विद्यार्थ्यांना व पालकांना चिल्ड्रन्स फ्युचर इंडिया संस्थेच्या सदस्यांनी शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगितले व इयत्ता दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शिक्षणासाठी कोणत्या संधी उपलब्ध आहेत याचीही माहिती दिली तसेच हि मदत कुठून केली जाते, कोण करतात आणि का करतात या संदर्भातही पालकांना व विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.



पालकांचे मुलांशी वर्तन कसे असावे व त्यांनी मुलांच्या अभ्यासाकडे जातीने लक्ष देण किती गरजेच आहे याबद्दल त्यांना समजावून सांगण्यात आले. या वेळी पालकांनीही सीएफआयच्या वतीने होता असलेल्या मदतीबद्दल आभार व्यक्त करीत धन्यवाद दिले.

## उरण तालुक्याचा ९६ टक्के निकाल

### *२८ पैकी ११ विद्यालयांचे शंभर टक्के यश*

**उरण : वार्ताहर**

दहावीच्या निकालात उरण तालुक्याचा निकाल ९६ टक्के इतका लागला आहे. यात एकूण २८ विद्यालयापैकी ११ विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला आहे. यावर्षी एकूण दोन हजार ४२८ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी दोन हजार ३१६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

एन. आय. हायस्कूल ८४.७१ टक्के, सेंट मेरी स्कूल १०० टक्के, सिटीझन हायस्कूल १०० टक्के, न्यू इंग्लिश स्कुल-मोरा ९०.४७, द्रोणागिरी करंजा-८१.२५, पांडुरंग चांगु पाटील ६४.२८, तू.ह. वाजेकर विद्यालय ९२.५१, छत्रपती शिवाजी हायस्कूल ८६.३१, महात्मा गांधी विद्यालय दिघोडे ९६.६२, कोकण एज्युकेशन चिरनेर ९४.९३, कर्मवीर भाऊराव पाटील ९७.६४, रामचंद्र म्हात्रे विद्यालय ९५.५०, छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय ९२.८५, उरण एज्युकेशन सोसायटी १०० टक्के, द्रोणागिरी करंजा-१०० टक्के, जेएनपी विद्यालय-१०० टक्के, जेएनपी विद्यालय-९७ ७९, रोटरी स्कुल १०० टक्के, प्रभाकर पाटील एज्युकेशन १०० टक्के, सेंट मेरी, जेएनपी - १०० टक्के, प्रभाकर पाटील एज्युकेशन ६६.६६, वीर सावरकर विद्यालय ९२.१०, पुंडलिक रामा पाटील विद्यालय १०० टक्के, जेईए १०० टक्के, इक्रा इंग्लिश स्कुल -९६.९६, पदाजी मुंबईकर विद्यालय ९९.२७, भागूबाई चांगु ठाकूर विद्यालय ९८.६४ तर कोकण एज्युकेशन १०० टक्के, अशी माहिती उरण पंचायत समितीच्या गट शिक्षण अधिकारी प्रियांका पाटील यांनी दिली आहे.













दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com